**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**
**अपील क्रमांक २००९/४४३७/०२**

**श्रीमती फरीदा कुरेशी,**
**१८०/१८२, सम्युअल स्ट्रीट,**
**तिसरा मजला, रुम नं.३,**
**मुंबई-४०००0९.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता(परिमंडळ-१),**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्वसन मंडळ,**
**रजनी महल,१ला मजला, ताडदेव,**
**मुंबई-४००००१**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ प्लॅनिंग आणि रिसर्च,**
**एन.एस.ई. डिपार्टमेंट, बी वार्ड, ३रा मजला,**
**मुंबई-.४००००१.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्रीम.फरीदा कुरेशी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२.९.०९ रोजी अर्ज करुन न्यु शेरीफ मेन्शन ही इमारत कोणत्या सालापासून महापालिकेच्या रेकॉर्डमध्ये आहे व ती पूर्वी कोणाच्या नावावर होती, मालमत्ता कर कोणाच्या नावाने अदा केला जात होता, आत्ता या इमारतीचा मालक कोण आहे, मालमत्ता कर कोणाच्या नावाने अदा केला जातो, सदर इमारत पूर्वी किती मजल्यांची हाती, आता किती मजल्यांची आहे इत्यादी एकूण २४ मुद्यांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दिनांक २०.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१३.११.०९ रोजी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २० मार्च,२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. अपीलकाराने न्यु शेरीफ मेन्शन इमारतीबाबत एकूण २४ मुद्यांवर माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी असे प्रतिपादन केले की, कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आली आहे. अपीलकाराने दिनांक २.९.०९ च्या अर्जानुसार प्रश्नोत्तराच्या स्वरुपात माहिती मागितली आहे. सदर प्रश्नोत्तर स्वरुपाच्या मुद्यांबाबत विशिष्ठ अशी माहिती पुरविण्यात आलेली नाही. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आली आहे. यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास सदर प्रकरणी माहिती पुरविलेली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२२.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४२६/०२**
**/४४२७/**

**श्री.अर्जूनलाल छाब्रिया(ॲडव्होकेट हायकोर्ट)**
**बेला विस्ता,प्लॉट नं.१५,**
**३रा मजला,लोक आणि एल.आय.सी.ऑफिस,**
**एस.व्ही.रोड,बांद्रा(प.),मुंबई-४०००५०. ......**
**अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा असिस्टंट म्युनिसिपल कमिशनर,**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई,**
**आर/साऊथ वार्ड ऑफीस,एम.जी.एक्स रोड नं.२,**
**कांदिवली(प.), मुंबई-४०००६७.**

**जन माहिती अधिकारी,**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई,**
**आर/साऊथ वार्ड ऑफीस,एम.जी.एक्स रोड नं.२,**
**कांदिवली(प.), मुंबई-४०००६७. ....... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.अर्जूनलाल एम. छाब्रीया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.१०.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे २९.६.२००९ रोजी अर्ज करुन कलम ३९४ नुसार अशिष हॉटेलला दिलेला परवाना,अग्निशमन कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र इत्यादी एकूण ८ अनुषंगिक मुद्यांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी रु.१२८/- इतके शुल्क आकारुन दि.१४.७.०९ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे दि.४.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली व अपिलकाराने अशिश हॉटेलबाबत मागणी केलेले कागदपत्र नि:शुल्करित्या पुरवावे असे दिनांक २६.९.०९ रोजी आदेश

पारित केले. प्रथम अपीलीय अधिका-यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिनांक २६.९.०९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान न झाल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदरअपीलावर २० मार्च,२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले व अपिलातील  कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याचे द्वितीय अपीलावरील सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. अपीलातील कागदपत्रांवरुन अपीलकारास माहिती पुरविल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक  २२.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४३२/०२**

**श्री.संदिप प्रकाश केदारे,**
**१७,१३६०,जुनी एम.एच.बी. कॉलनी,**
**गोराई रोड,बारिवली(प.),**
**मुंबई-४०००९१. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा प्राचार्य,**
**अनुदत्त माध्यमिक उच्च माध्यमिक व महाविद्यालय,**
**आकुर्ली रोड, कांदिवली(प.),**
**मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
**अनुदत्त माध्यमिक उच्च माध्यमिक व महाविद्यालय,**
**आकुर्ली रोड, कांदिवली(प.),**
**मुंबई. ....... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.संदिप प्रकाश केदारे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ४.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे २९.८.२००९ रोजी अर्ज करुन वर्ग-२,वर्ग-३ व वर्ग-४ श्रेणीतील कर्मचा-यांच्या नियमबाहय झालेल्या नेमणुकांबाबतचा तपशील,सेवाजेष्ठता यादी, बिंदुनामावली सरळसेवा भरती/ ५० बिंदूनामावली पदोन्नतीची प्रत, वेतननिश्चितीची दुय्यम प्रत,नेमणुकीचे पत्र इत्यादी अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी आवश्यक ती माहिती विहित कालावधीत दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे दि.२१.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२० मार्च,२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही, प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. दोन्ही अधिका-यांची सदर कृती निश्‍चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**

दिनांक २२.३.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४३९/०२**

**श्री.संदिप काशिराम माने,**
**२,साईकृपा निवास राजनपाडा,**
**लिंक रोड,मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता/**
**सहाय्यक आयुक्त,**
**पी/उत्तर विभाग कार्यालय, मामलेदार वाडी,**
**लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इमारत व कारखाने),**
**पी/उत्तर विभाग कार्यालय, मामलेदार वाडी,**
**लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४.**

....... **उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.संदिप काशिराम माने यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १८.९.२००७ रोजी अर्ज करुन संपूर्णा हॅाटेलच्या इमारतीचा खालील लिंक रोड,राजन पाडा, मालाड(प.), मुंबई या हॅाटेलच्या मालकाने संपूर्णा हॅाटेलच्या इमारतीच्या आतील मोकळया परिसरात इमारतीला असणा-या कुंपणास जोडून लोखंडी चॅनेल लाऊन त्यावर प्लास्टीकच्या पत्र्याचे छप्पर बांधण्यात आले आहे ते अधिकृत आहे का अनधिकृत आहे याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.१२.११.०७ रोजी प्रथम अपीलीय अधिका-याकडे अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.२८.१२.०७ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होऊन

अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावरील सुनावणी दि.२० मार्च,२०१० रोजी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले, अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन संपूर्णा हॉटेलच्या मालकाने केलेल्या बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची ही कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २२.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४०/०२**

**श्री.संदिप काशिराम माने,**
**२,साईकृपा निवास राजनपाडा,**
**लिंक रोड,मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४.** **..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता/**
**सहाय्यक म.न.पा.आयुक्त,**
**पी/उत्तर विभाग कार्यालय, मामलेदार वाडी,**
**लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इमारत व कारखाने),**
**पी/उत्तर विभाग कार्यालय, मामलेदार वाडी,**
**लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४.**

**....... उत्तरवादी**

## विवेचन

अर्जदार श्री.संदिप काशिराम माने यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १७.९.२००७ रोजी अर्ज करुन एस.सी.फोर्डे, धीरज सागर इमारत, मालाड(प.) मुंबई-६४ येथील फोर्डच्या मालकाने इमारतीचा स्लॅब तोडून बाल्कनी बनविली आहे. तसेच आतील भुयारी जागेवर इमारतीच्या मंजूर आराखडयामध्ये पूर्वी वाहने उभी करण्याची जागा होती त्या जागेवर औद्योगिक कार्यालय बनविले आहे. हे अधिकृत आहे की अनधिकृत याबाबत अनुषंगिक माहिती मागितली हाती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दिनांक १२.११.०७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.२८.१२.०७ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान न झाल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २० मार्च,२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन एस.सी.फोर्डेच्या मालकाने केलेल्या बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २२.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३८५/०२**

**श्री.पोळ अविनाश शिवप्पा,**
**द्वारा- सेक्टर-८,रुम नंबर ८,**
**कोपनखैरने, नवी मुंबई** **..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,**
**मुंबई मध्यवर्ती कारागृह,**
**मुंबई-४०००११.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,**
**मुंबई मध्यवर्ती कारागृह,**
**मुंबई-४०००११.**

**....... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.पोळ अविनाश शिवप्पा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे २९.९.०९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

डॉ.सुनंदा रविंद्र कटके या आपल्या कार्यालयात सन २००१ ते ३००४ या कालावधीत कार्यरत होत्या काय? असल्यास त्यांची सेवा स्थायी होती की अस्थायी? स्थायी असल्यास त्यांना वेतनवाढी देय होत्या काय? त्या त्यांना आपल्या आस्थापने अंतर्गत दिल्या गेल्या आहेत काय? दिल्या गेल्या असल्यास किती दिल्या गेल्या त्याची संपूर्ण माहिती साक्षांकित प्रतीत देण्यांत यावी. दिल्या गेल्या नसल्यास त्याची काय कारणे आहेत? दिल्या गेल्या नसल्यास यास कोण अधिकारी/कर्मचारी जबाबदार आहे? त्यावर काय कारवाई करण्यांत आलेली आहे याची अत्थंभूत माहिती मिळावी. तसेच याच संदर्भात पोलीस शल्य चिकित्सक, मुंबई यांनी दि.२२.६.२००९ रोजी

आपल्या कार्यालयाकडे पत्रव्यवहार केला होता काय? त्यावर आपल्या कार्यालयाने उत्तर दिलले आहे काय? नसल्यास त्याची काय कारणे आहेत. असल्यास त्याची साक्षांकित प्रत मिळावी.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे दि.२९.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी, सन २००१ ते २००४ या कालावधीत मुंबई मध्यवर्ती कारागृहाचे आस्थापनेवर कार्यरत असलेल्या डॉ.सुनंदा कटके यांची सेवा,वेतनवाढ इत्यादीबाबतची माहिती क्र.जा.क्र.३७३३/०९ दिनांक १०.१०.०९ अन्वये अपीलकारास दिली आहे. जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती बरोबर असून त्या माहितीशी सहमत असल्याचे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.५.१२.०९च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १९.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन डॉ.सुनंदा रविंद्र कटके यांची सेवाविषयक माहिती मागीतली हाती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. यावरुन अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २५.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३८९/०२**

**श्री. इंद्र बहादूर शर्मा,**
**१०, शर्मा चाळ,अंधेरी-कुर्ला रोड,**
**कृष्ण नगर, मरोळ नाका,**
**अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००६९. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता, के-पूर्व वार्ड ऑफीस इमारत,**
**आझाद रोड, गुंडवली, अंधेरी(पूर्व),**
**मुबई-४०००६९.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,**
**के-पूर्व वार्ड ऑफीस इमारत,**
**आझाद रोड, गुंडवली, अंधेरी(पूर्व),**
**मुबई-४०००६९. ....... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.इंद्र बहादूर शर्मा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १४.९.०९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)आपण घनश्यामदास पोद्दार विद्यालयाच्या अनधिकृत बांधकामाबद्दल राजस्थानी सेवा संघ यांच्यावर एम.आर.टी.पी. घेतलेली आहे. त्याची कॉरपोरेशनने नोटीस २७.१२.२००४ मध्ये दिलेली आहे. त्याची एम.आर.टी.पी. ची कॉपी द्यावी.

२)कोणा कोणाच्या नावावरती एम.आर.टी.पी. घेतलेली आहे त्याची सविस्तर यादी द्यावी.

३) एम.आर.टी.पी.ची केस कोर्टात चालू आहे किंवा नाही? त्याची संपूर्ण माहिती स्पष्टपणे द्यावी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२७.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२०.११.०९ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता के/पूर्व विभाग यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांना आदेश दिले की, अपीलकारास निःशुल्करित्या माहिती पुरवावी. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, घनश्यामदास पोद्दार विद्यालयाच्या अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अर्जातील मुद्दा क्र.३ बाबत अपीलकारास माहिती पुरविण्यात आली नव्हती. त्यामुळे अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले होते. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविलेली नाही. याकरिता जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करण्यात येऊ नये याबाबत जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २३.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३८७/०२**

**श्री. आनंद श्रीरंग सारंग,**
**यशोदा कुंज, रोड नं.१,**
**चेंबूर, मुंबई-४०००७१.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**डेप्युटी चिफ इंजिनिअर,बी.पी.ई.एस.,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,राज लिगसी जवळ,**
**पेपर मिल कंपाऊंड, विक्रोळी(प.),मुंबई-४०००८३.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बी.पी.ई.एस.,बृहन्मुंबई महानगरपालिका,राज लिगसी जवळ,**
**पेपर मिल कंपाऊंड, विक्रोळी(प.),मुंबई-४०००८३.**

....... **उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.आनंद सारंग यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे २.७.०९ रोजी अर्ज करुन यशोदा कुंज, रोड क्र.१ चेंबूर, मुंबई येथील इमारतींमधील सदनिका क्र.४ व ४अे मध्ये अनधिकृतरित्या वापरात बदल केला याबाबत एकूण १५ मुद्यांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. याबाबत माहिती देणे सोईचे व्हावे म्हणून अपीलकाराने प्रथम संबंधित कागदपत्राचे निरिक्षण करावे. त्यानंतर अपीलकारास विहित शुल्क आकारुन निवडक कागदपत्रांच्या प्रती पुरविण्यात येतील असे जन माहिती अधिका-यांनी दि.१.९.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने दि.२४.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. इमारत प्रस्तावाच्या क्र.सीई/५५७७/बीपीइएस/अेएम बाबत प्रश्नोत्तर स्वरुपात माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती प्रश्नोत्तर स्वरुपातील अभिप्राय/शे-यांबाबत असल्याने संबंधीत फाईलचे निरिक्षण केल्यानंतर निवडक कागदपत्रांच्या प्रती देण्याबाबत जन माहिती अधिका-याने घेतलेली

भूमिका कायम करुन १५ दिवसात अपीलकारास माहिती द्यावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.९.१२.०९ रोजी आदेश पारित केले. यामुळे अपीलकाराने द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन यशोदा कुंज इमारतीमधील सदनिका क्र.४ व ४अे बाबत अनुंषंगिक माहिती मागीतली होती. सदनिका क्र.४ व ४अे मध्ये फेरबदल करण्यास दि.१८.५.०९ च्या पत्रान्वये विशिष्ट अटी घालून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. सदर अटींची सदर प्रकरणी पूर्तता झाली किंवा कसे याबाबत अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी. ना-हरकत प्रमाणपत्राची प्रतही अपीलकारास द्यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांक २३.३.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३५९/०२**

**श्री. मोईनुद्दीन खान,**
**बावला बिल्डिंग,२रा मजला,**
**रुम नं.२८/२९, १ली सांकली स्ट्रीट क्रॉस लेन,**
**भायखळा, मुंबई-४०००५१.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**डेप्युटी चिफ इंजिनिअर,एम.बी.आर अँड आर रोड,**
**सर्कल-३,शिंदे वाडी,दादर,**
**मुंबई-४०००१४.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**ई डिव्हीजन,एम.बी.आर.अँड आर रोड,**
**अभ्युदय नगर, काळा चौकी,**
**मुंबई-४०००३३.** ....... **उत्तरवादी**

## विवेचन

अर्जदार श्री.मोईनद्दीन खान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १५.१०.०९ रोजी अर्ज करुन उप अभियता-II एम.बी.आर.अँड आर बोर्ड यांनी पाठविलेल्या दि.१४.९.२००९ या पत्रावर आणि दि.६.६.०९च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१८.१२.०९च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१५.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.३.०९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते,अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन उप अभियंता-II यांच्या दि.६.६.२००९ च्या पत्रावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१४.१२.०९ च्या पत्रानुसार माहिती पुरविली आहे. सदर माहितीने समाधान झाले नसल्याचा अपीलकाराने द्वितीय अपीलात मुद्दा उपस्थित केला आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिका-यांनी वस्तुस्थितीवर आधारीत पुरविलेल्या माहितीबाबत अपीलकाराचा विवाद(Disputes) आहे. अपीलकाराच्या दाव्याबाबत आयोग कांही करु शकत नाही. सदर प्रकरणी मागणीप्रमाणे अपीलकारास माहिती पुरविण्यात आली आहे. विकासकाविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नसल्याची माहिती दिली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २३.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४६१/०२**

**श्री. अश्विन एन. प्रजापती,**
**विवेक भुषण चाळ, जरीमरी बस स्टॉप,**
**आनंदवन हॉटेल जवळ, साकीनाका,**
**मुंबई-४०००७२. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता(विशेष),एल विभाग,**
**म्यनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई,**
**एल वार्ड ऑफीस, कुर्ला(प.),**
**लक्ष्मणराव यादव मार्केट,१ला मजला,एस.जी.बर्वे मार्ग,**
**मुंबई-४०००७०.**

**जन माहिती अधिकारी तथा उद्यान विद्या सहायक,**
**एल वार्ड, गार्डन डिपार्टमेंट, कुर्ला(प.),**
**मुंबई-४००००. ....... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.अश्विन एन. प्रजापती यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ४.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे ८.६..०९ रोजी अर्ज करुन कुर्ला गाव, के.पी.कंपाऊंड ९० फुटी रोड, जरीमरी बसस्टॉप, कुर्ला(प.), मुंबई-७२ येथील सी.टी.सर्व्हे क्र.६२४ ते ६२६,८८१ येथील वृक्ष अवैधरित्या तोडल्याबाबत तक्रार केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईबाबत अनुषंगिक एकूण ९ मुद्यांबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.७.७.०९ च्या पत्रान्वये माहिती दिली. पूर्ण माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.७.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल

केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.४.९.०९ रोजी सुनावणी आयोजित केली. दि.२२.९.०९ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.३.०९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता उत्तरवादी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सी.टी.सर्व्हे क्र.६२४ ते ६२६ व ८८१ कुर्ला गांव/मोहाली गाव येथील वृक्ष अनधिकृतरित्या तोडल्याबाबत तक्रार केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविलेल्या माहितीने अपीलकाराचे समाधान झाले नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अधीक्षक, उद्याने आणि वृक्ष अधिकारी यांनी दि.१२.३.०८ रोजी पाठविलेल्या पत्रावर उत्तरवादीने केलेल्या कार्यवाहीची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २५.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३९५/०२**

**श्री. ॲग्नेलो जोसेफ पिंटो,**
**२१४/२२०,गोवर्धन मेन्शन,**
**१ला मजला, डॉ.वेगास स्ट्रीट,**
**मुंबई-४००००२.** **..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता, सी३-४ विभाग कार्यालय,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**१०-१२ रोपा लेन, चंदनवाडी,**
**मुंबई-४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता, सी३-४ विभाग कार्यालय,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**१०-१२ रोपा लेन, चंदनवाडी,**
**मुंबई-४०० ००२.** **...... उत्तरवादी**

## विवेचन

अर्जदार श्री.ॲग्नेलो जोसेफ पिंटो यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे ९.९.०९ रोजी अर्ज करुन गोवर्धन मेन्शन इमारतीतील दुस-या माळयावरील भाडेकरुने अवैध बांधकाम केले, गॅलरी काढली अशी तक्रार केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. दि.१.८.०९ रोजी कार्यकारी अभियंता, सी३/४ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांनी लिहिलेल्या पत्रावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने दि.३०.१०.०९ रोजी प्रथम

अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास ३ आठवडयाचे आत माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.४.१२.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन भाडेकरुने दुस-या मजल्यावरील २१४/२२० गोवर्धन मेन्शन येथे अवैधरित्या बांधकाम केल्याबाबत तक्रार केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. अपीलकारास ३ आठवडयाचे आत माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी दि.४.१२.०९ रोजी आदेश पारित केले होते. जन माहिती अधिका-यांनी सदर आदेशाचे पालन केले नाही. अपीलकारास माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित वेळेत माहिती पुरविली नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरीता जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत १५ दिवसांचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २५.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३९१/०२**

**श्री. सईदुर रेहमान,**
**१८२,धाबू स्ट्रीट,सैफी मस्जीद जवळ,**
**नळ बाजार, मुंबई-४००००३. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**अंजूमन ई इस्लाम,**
**बद्रुद्दिन तय्यबजी मार्ग,**
**९२,डी.एन.रोड,**
**मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अधिकारी,**
**अंजूमन ई इस्लाम,**
**बद्रुद्दिन तय्यबजी मार्ग,**
**९२,डी.एन.रोड,**
**मुंबई-४००००१. ....... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.सईदूर रेहमान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.१.१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १८.५.१० रोजी अर्ज करुन अंजूमन, कुर्ला मुलांचे हायस्कूलच्या मुख्याध्यापिकांविरुध्द दि.२९.४.०९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२४.१०.०९ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांची चुकीची, दिशाभूल करणारी माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२६.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम

अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अंजूमन-ई-इस्लाम, कुर्ला मुलांचे वसतिगृहाच्या मुख्याध्यापिका यांच्याकडून अधिकाराचा गैरवापर करुन अनियमितता केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. या प्रकरणी मुख्य माहिती आयुक्तांनी पूर्वीच निर्णय दिला असल्याचे समजते. या परिस्थितीत सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २३.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४००/०२**

**श्री. अर्जूनलाल छाब्रीया,**
**बेला व्हीस्टा,फ्लॅट नं.१५,**
**३रा मजला, लेक आणि एल.आय.सी. अफीस समोर,**
**एस.व्ही.रोड,**
**बांद्रा(प.), मुंबई-४०००५०** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**असिस्टंट म्युनिसिपल कमिशनर/कार्यकारी अभियंता,**
**आर/नॉर्थ म्युनिसिपल वार्ड ऑफीस,**
**दहिसर(प.), मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अधिकारी,**
**सहाय्यक अभियंता,**
**आर/नॉर्थ म्युनिसिपल वार्ड ऑफीस,**
**दहिसर(प.), मुंबइ.** ....... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.अर्जूनलाल छाब्रीया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१.१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे ९.१०.२००९ रोजी अर्ज करुन तक्रारदार श्री.गोविंद सखाराम कापसे यांनी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी जागेवर पाहणी करुन अपीलकारास माहिती पुरविली आहे. सदर माहिती खोटी

असल्याचे अपीलकाराचे म्हणणे आहे. जन माहिती अधिका-यांनी पुन्हा साईटची पहाणी करावी व अपीलकारास पूर्वी दिलेली माहिती बरोबर असल्याची खात्री करावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२१.१.०९ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्री.गोविंद सखाराम कापसे यांनी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत ती असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २५.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३६२/०२**

**श्रीमती सरला जयेश काटेलिया,**
**रुम नं.६०४, सहावा मजला, पार्क व्हयू बिल्डिंग नं.१/बी,**
**धोतीवाला कंपाऊंड, संत सावता मार्ग नं.२,**
**भायखळा(पूर्व), मुंबई-२७.** **..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**उप प्रमुख अभियंता(इमारत प्रस्ताव),शहर,**
**ई विभाग, महापालीका कार्यालय,**
**३रा मजला, शेख हाफीजुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता(इमारत प्रस्ताव)शहर,**
**ई विभाग, महापालीका कार्यालय,**
**३रा मजला, शेख हाफीजुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई-४००००८.** **....... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्रीमती सरला जयेश काटेलिया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे २४.९.०९ रोजी अर्ज करुन सोमनाथ सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासाबाबतच्या फाईलचे निरिक्षण करुन आवश्यक कागदपत्र मिळण्याची मागणी केली होती. निरिक्षणाकरिता, कागपत्रांच्या प्रमाणित प्रतीकरिता आवश्यक शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२०.१०.२००९ च्या पत्रान्वये कळविले होते. संबंधित फाईलच्या निरिक्षणाकरिता अपीलकार

कार्यालयात हजर झाल्या असता फाईल हरवली असल्याचे कारणावरुन फाईल निरिक्षणाकरिता उपलबध करुन दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.७.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. अपीलकारास माहिती दिली नाही. यामळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सोमनाथ सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुर्नविकासाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर संस्थेच्या पुर्नविकासाबाबत शासनाने निर्गमित केलेल्या परिपत्रकाची प्रत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरवावी. संबंधीत फाईलचा कसून शोध घ्यावा व संबंधीत फाईल निरिक्षणाकरीता अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी.

## **<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई<br>
दिनांक २५.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**<br>
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४०२/०२**

**श्री.राजकुमार प्रताप सिंग,**
**२३/बी, मेहेर अपार्टमेंट्स,ॲनेस्टी रोड,**
**मुंबई-४०००२६** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**कामगार आयुक्त,महाराष्ट्र राज्य,**
**कॉमर्स सेंटर,सी.एस.लिमिटेड,**
**७८ ताडदेव रोड,**
**मुंबई-३४.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कामगार आयुक्त,महाराष्ट्र राज्य,**
**कॉमर्स सेंटर,सी.एस.लिमिटेड,**
**७८ ताडदेव रोड,**
**मुंबई-३४.** ...... **उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.राजकुमार प्रताप सिंग यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १५.१२.२००८ रोजी अर्ज करुन कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबईचा परिसर कामगार आयुक्तांच्या ताब्यात असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१२.१.०९च्या पत्रानुसार माहिती पुरविली. जन माहिती अधिका-यांनी संपूर्ण माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकायांनी दि.४.८.०९ रोजी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार हजर झाले नाहीत. जन माहिती

अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपीलीय अधिका-यांना दि.१०.८.०९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.ओएफए-१९६६/एफ, दि.१४.५.१९६६च्या परिपत्रकाची प्रत अपीलकारास दि.१२.१.०९च्या पत्रासोबत पुरविली तसेच कामगार आयुक्त आणि जमीन मालक यांच्यामध्ये कोणताही भाडेकरार/लीज करार झालेला नाही असेही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. यावरुन सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई<br>
दिनांक २५.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**<br>
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३६३/०२**

**श्रीमती विशाखा विनायक इंगळे,**
**बी-६, अलंकार सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**टिळक नगर,चेंबूर(प.), मुंबई-४०००८९.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**उपशिक्षण अधिकारी,परिमंडळ-५,**
**एम विभाग,म.न.पा.कार्यालय इमारत,**
**३रा मजला,खोली क्र.३१२, नटराज सिनेमाजवळ,**
**चेंबूर-४०००७१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रशासकीय अधिकारी(शाळा),**
**एम(पूर्व)-२ विभाग, एम/पश्चिम,**
**म.न.पा.विभाग कार्यालय,चेंबूर,**
**मुंबई-४०००७१.** ....... **उत्तरवादी**

## विवेचन

अर्जदार श्रीमती विशाखा विनायक इंगळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे ३.१०.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलली माहिती मागितली होती:-

बदली संदर्भात दिनांक २४.८.०९ रोजी आपल्या कार्यालयात सादर करण्यात आलेल्या अर्जाची सद्यस्थिती तसेच अणिक गांव म्यु.म.शाळेचे इनपूट व शेरे पुस्तकात वरिष्ठ अधिका-यांनी नोंदविलेले शेरे, अभिप्राय इत्यादी आणि संबंधित मुख्याध्यापकांनी वेळोवेळी काढलेल्या सुचना/नोटीस यांच्या झेरॉक्स प्रती पुरविण्याबाबत.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.९.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२७.११.०९ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकाडे अर्ज करुन बदलीबाबत दि.२४.८.०९ रोजी कार्यालयात सादर केलेल्या अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २३.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४२९/०२**

**श्री.अर्जूनलाल छाब्रीया,**
**बेला व्हीस्टा,फ्लॅट नं.१५,**
**३रा मजला, लेक आणि एल.आय.सी. अफीस समोर,**
**एस.व्ही.रोड,**
**बांद्रा(प.), मुंबई-४०००५०** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**असिस्टंट म्युनिसिपल कमिशनर,**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई,**
**पी/नॉर्थ वार्ड ऑफीस, लिबर्टी गार्डन,**
**मालाड(प.), मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मेडीकल अँड हेल्थ ऑफीसर,**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई,**
**पी/नॉर्थ वार्ड ऑफीस, लिबर्टी गार्डन,**
**मालाड(प.), मुंबई-४०००६४.** ...... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.अर्जूनलाल छाब्रीया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.१०.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे ६.७.२००९ रोजी अर्ज करुन श्री.हज्जरत अली महम्मुद मकनोजा यांनी महाराष्ट्र अन्न भेसळ प्रतिबंध नियम १९६२ मधील कलम ३९४ अनुसार आरोग्य अनुज्ञाप्ती श्री.गोपाळ बी.शाह, कृष्णा हॉटेल आता सदर नाव बदलून गोल्डन हॉटेल, दुकान क्र.२ शीव सम्राट चाळीसमोर बुलबुल नेस्ट जवळ,खारोडी गांव, मार्वे रोड, मालाड(प.), मुंबई यांना हस्तांतरीत केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य

माहिती आयोगाकडे दि.५.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी अर्जदार डॉ.अर्जूनलाल छाब्रीया यांना द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी सांगण्यात आले की, अर्जदाराने सदर प्रकरणी त्यांच्या अशीलाने सही केलेला अर्ज सोबत विक्रीखताची प्रत सादर करावी. त्यानंतर जन माहिती अधिका-यांना पुढील कारवाई करणे सोईचे होईल. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २५.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४८४/०२**

**श्री.दिपक आजगांवकर,**
**५०१/५०६, ऑरबीट हाईटस-२,**
**जावजी दादाजी मार्ग, नाना चौक,**
**मुंबई-४००००७** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**संचालक(माहिती)(वृत्त व जनसंपर्क),**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासन भवन,१७वा मजला,**
**मंत्रालयासमोर, मुंबई-३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**संशोधन अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासन भवन,१७वा मजला,**
**मंत्रालयासमोर, मुंबई-३२.** ..... **उत्तरवादी**

## विवेचन

अर्जदार श्री.दिपक आजगांवकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे २०.६.२००९ रोजी अर्ज करुन चलत मुव्ही छायाचित्रपरिचर हे पद शासनाने निर्माण केले त्यावेळचे शासन निर्णय व त्या पदाच्या पदोन्नतीबाबतचे शासन निर्णयाची प्रत, पद निर्माण झाल्यापासून २००९ पर्यंतचे सेवाप्रवेशाचे शासन निर्णय व निकष याची प्रत, दूरदर्शन चलत छायाचित्रकार व (मुव्ही) चलत छायाचित्रकार यांचे सेवाप्रवेशाची प्रत इत्यादि माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१४.७.०९च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. जन माहिती अधिका-यांनी समाधानकारक माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.१३.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.६.१०.०९ रोजी आदेश पारित केले. यामळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधीकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, चलत मुव्ही छायाचित्रपरिचर पदाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास संबंधीत नियमाच्या प्रती पुरविल्या आहेत. चलत(मुव्ही) छायाचित्रपरिचर या पदाच्या पदनामाबाबत विवाद आहे. सदर पदनामाबाबतचा Dispute माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत सोडवता येणार नाही. याकरीता अपीलकाराने संबंधीत सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४८१/०२**

**श्री. सुरेंद्र मोहीते,**
**२४२/१, डॉ.आंबेडकर चौक,**
**कर्ला(प.),**
**मुंबई-४०००७०** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एल वार्ड कार्यालय,**
**लक्ष्मणराव यादव मार्केट,१ला मजला,एस.जी.बर्वे मार्ग,**
**कुर्ला(प.), मुंबई-४०००७०.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एल वार्ड कार्यालय,**
**लक्ष्मणराव यादव मार्केट,१ला मजला,एस.जी.बर्वे मार्ग,**
**कुर्ला(प.), मुंबई-४०००७०.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.सुरेंद्र मारुती मोहिते यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे ३१.१०.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)स्वस्तीक फरसाण मार्ट आणि स्वस्तिक मॅचींग सेंटर हे दोन भाग असणा-या वास्तुंना आपल्या म.न.पा.कायद्याप्रमाणे Ten Table(किरकोळ दुरुस्ती)परवाना कोणत्या सबबी खाली कोणत्या स्वरुपाच्या अर्जावर देण्यात आलेला आहे त्यांची एक छायांकित प्रत इतर कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह देण्यात यावी.

२) त्याचप्रमाणे काम पूर्ण झाल्यावर मेजरमेंट(मोजमाप) आपण घेतले असेल व त्यांनी(दुकान मालकाने) काम झालेल्याचे पत्रव्यवहार केलेल्याची प्रत तसेच दुकान मालकाने जुन्या बांधकामाचे आढावा घतलेले कागदोपत्री पुरावे जुने व नवे फोटो काढलेले, त्यांच्या कलर प्रती आणि फोटो काढणा-या दुकान मालकाच्या बिलाची छायांकित पण साक्षांकित प्रतीसह मला कागदपत्रे मिळावीत.

३)हे दुकान खाद्य पदार्थांचे असल्या कारणाने किती बाय कितीचे क्षेत्रफळ आहे ते नमूद करुन आरोग्य खात्याने हयांना कशारितीने कोणता परवाना दिला आहे.Eating House सदराखाली त्याचप्रमाणे इमारत दुरुस्ती कारखाने विभाग एल वार्ड, कुर्ला तसेच इमारत प्रस्ताव दुरुस्त विभाग, विक्रोळी हया खात्यांच्या नियमाप्रमाणे ही इमारत, हे दुकान व मकान बसत असेल तर म.न.पा. ॲक्ट नुसार संपूर्ण खात्याने कायदेशीर दिलेले सर्व परवाने, सर्व कागदपत्रांच्यासह छायांकित प्रती देण्यात याव्यात, तसेच हया दुकानामध्ये संडास, मोरी हयाची माहिती योग्यरित्या शुद्ध मराठीत देण्यात यावी. त्याचप्रमाणे या विभागातील लोकप्रतिनिधी हयांचे हया दुकानाच्या दुरुस्तीसाठी लेखी किंवा तोंडी आदेश आहेत का? असतील तर त्याचीही माहिती प्रत देण्यात यावी.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.३१.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. स्वस्तीक फरसाण मार्ट आणि स्वस्तीक मॅचींग सेंटरच्या दुरुस्ती संबंधीच्या परवानगी संबंधीची माहिती अपीलकारास मिळाली आहे. परंतु दुरुस्तीच्या नावाखाली अनधिकृत बांधकाम करण्यात आले असल्याचे अपीलकाराने प्रथम अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. संबंधीत साईटची जन माहिती अधिका-यांनी पाहणी करुन वस्तुस्थिती तपासून पहावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.११.१२.०९ रोजी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. सदर बाब अपीलकारासही अवगत केली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित नव्हते, जन माहिती अधिकारी उपस्थित होते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन स्वस्तीक फरसाण मार्ट व स्वस्तीक मॅचींग सेंटरच्या अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी असे प्रतिपादन केले की, अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली

आहे. द्वितीय अपीलावरील सुनावणीसाठी अपीलकार उपस्थित नव्हते. या प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याने मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांक २६.३.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३७८/०२**

**श्री. डॉ.रमेश डोईफोडे,**
**टी.बी.सी.-८०, गुजराती मनपा शाळेसमोर,**
**ठक्करबाप्पा कालनी, चेंबूर,**
**मुंबई-४०००७१.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एम- पश्चिम विभाग कार्यालय,**
**चेंबूर,मुंबई-४०००७१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कर निर्धारक व संकलन,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एम- पश्चिम विभाग कार्यालय,**
**चेंबूर,मुंबई-४०००७१.** ..... **उत्तरवादी**

## विवेचन

अर्जदार डॉ.श्री. रमेश के.डोईफोडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.१२.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे २८.८.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)दि.२८.१.२००६ रोजी Assessor & Collector MW Ward यांनी कानबा पांडूरंग डोईफोडेना दिलेली R.V. for year २००५-०६ ची साक्षांकित छायांकित प्रत

२)Surveyor's Report dtd. २७.१०.२००५ ची साक्षांकित छायांकित प्रत मिळावी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास असे कळविले की, स्पेशल नोटीसची एकच प्रत तयार करण्यात येते व ती पक्षकारास देण्यात येते. सदर नोटीसची प्रत देणे शक्य नाही.

दि.२७.५.२००५ च्या सर्वेक्षण अहवालाची साक्षांकित केलेली प्रत दि.२३.९.०९च्या पत्रासोबत पुरविली. पुरविलेली माहिती दिशाभूल करणारी असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२१.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी तथा करनिर्धारक व संकलक एम/पश्चिम विभाग यांनी कार्यालयीन अभिलेखानुसार उपलब्ध असलेली माहिती दिलेली असून सदर माहिती खोटी नाही. कार्यालयातील अभिलेखानुसार माहिती दिलेली आहे असे नमूद करुन दि.२३.११.०९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकालात काढले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन स्पेशल नोटीसची व दि.२७.१०.०९च्या अहवालाची साक्षांकित प्रत मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी पुरविलेली माहिती खोटी असल्याचा अपीलकाराने द्वितीय अपीलात मुद्दा उपस्थित केला आहे. सदर प्रकरणी माहिती अधिकारांतर्गत नमूद केलेल्या मालमत्ता क्र.१४९७(४डी) लेखा क्र.११-१०९-०२-८ बाबत कार्यालयात जो अभिलेख उपलब्ध आहे त्यानुसार सदर माहिती अपीलकारास देण्यात आली आहे असे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, माहितीच्या अधिकारात नमूद केलेल्या मालमत्तेसंबंधीच्या उता-याची प्रत अपीलकारास द्यावी. त्यामध्ये नमूद केलेल्या आशयासंबंधीची माहिती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४८२/०२**

**श्री. विनोद गणपत सावंत,**
**बी-७०१,संगिता को.ऑप.हौ.सो.प्लॉट क्र.६५,**
**गोराई-२, गोराई खाडी,आर.एस.एल.टी.रोड,**
**बोरीवली(प.), मुंबई-४०००९२. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी,**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**उत्तर विभाग,रत्नागिरी यांचे कार्यालय,**
**चिपळूण,जि.रत्नागिरी. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. विनोद सावंत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागितली होती :-

गेल्या पाच वर्षामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तिवरेघेरा प्रचितगड ते नायरी ता.संगमेश्वर जिल्हा-रत्नागिरी दोन गांवातील वाहतुकीच्या रस्त्यावर किती वेळा डांबरीकरण व कोटींग करण्यात आले? सदर डांबरीकरण व कोटींगसाठी जाहीरात करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या काय? सदर डांबरीकरण व कोटींग करीता निविदा सादर करणा-या ठेकेदाराचे/संस्थेचे नाव काय? सदर डांबरीकरण व कोटींग करीता सरकारी ठेकेदार नेमला होता काय? सदर डांबरीकरण व कोटींग करीता सार्वजनिक बांधकाम विभागाकाडून कोणत्या ठेकेदाराला ठेकेदारी दिली होती? सदर डांबरीकरण व कोटींग करीता शासनाचा किती निधी खर्च झाला? (सदर माहिती प्रत्येक वर्षनिहाय, दोन गावांची वेगवेगळी, ठेकेदाराचे नाव/संस्थेचे नाव/खर्च/ज्या ठेकेदाराने रस्त्याचे डांबरीकरण व कोटींगचे काम केले आहे त्या रस्त्याची लांबी व रुंदी अशी वेगवेगळी मिळण्यास विनंती आहे)

२) गेल्या पाच वर्षात तिवरेघेरा प्रचितगड ते नायरी ता.संगमेश्वर, जिल्हा-रत्नागिरी या दोन गावातील वाहतुकीच्या रस्त्यावर करण्यात आलेले डांबरीकरण व कोटींगच्या कामाची पहाणी करुन काम पूर्ण झाले याबाबत शाखा अभियंता यांचा अहवाल व वर्क ऑर्डरची छायांकित प्रत मिळण्यास विनंती आहे.

३) गेल्या दोन वर्षापूर्वी तिवरेघेरा प्रचितगड ते नायरी, ता.संगमेश्वर, जिल्हा-रत्नागिरी या दोन गावातील वाहतुकीच्या रस्त्यावर नायरी सती ते तिवरे एस.टी.स्टँड पर्यंत डांबरीकरण व कोटींगसाठी मंजुरी मिळाली होती हे खरे आहे काय?

४) असल्यास त्याच्या निविदा जाहीरात देऊन मागविण्यात आल्या होत्या काय? मागविण्यात आल्या असल्यास किती जणांनी निविदा सादर केल्या होत्या? त्या ठेकेदारांची नावे काय? सदर कामाकरीता सरकारी ठेकेदार मेमला होता काय? सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कोणत्या ठेकेदाराला ठेकेदारी दिली होती त्याचे नाव व संस्थेचे नाव काय? सदर डांबरीकरण व कोटींगकरीता शासनाचा किती निधी खर्च झाला? (काढण्यात आलेल्या निविदांची छायांकित प्रत मिळण्यास विनंती आहे तसेच ज्या ठेकेदाराला काम दिले त्याची वर्क ऑर्डर व कामाची पहाणी करुन काम पूर्ण झाले याबाबत शाखा अभियंता यांचा अहवाल मिळण्यास विनंती आहे.)

५)काम झाले नसल्यास कोणत्या कारणासतव गेल्या दोन वर्षापासून सदर वाहतुक रस्त्याचे डांबरीकरण व कोटींग करण्यात आले नाही?

६) गेल्या पाच वर्षात तिवरेघेरा प्रचितगड व नायरी ता.संगमेश्वर,जिल्हा- रत्नागिरी या दोन गावाला जोडणारा शास्त्री नदीच्या पुलाला सार्वजनिक बांधकाम विभागाकडून किती वेळा रंगरंगोटी करण्यात आली? सदर रंगरंगोटीकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कोणत्या ठेकेदाराला ठेकेदारी दिली होती? सदर रंगरंगोटीकरीता शासनाचा किती निधी खर्च झाला? सदर माहिती प्रत्येक वर्षनिहाय,वेगवेगळी, ठेकेदाराचे नाव/संस्थेचे नाव/खर्च याबाबत माहिती मिळण्यास विनंती आहे.

७) गेल्या पांच वर्षात तिवरेघेरा प्रचितगड ते नायरी ता.संगमेश्वर, जि,रत्नागिरी या दोन गावांना जोडणारा शास्त्री नदीच्या पुलाला करण्यात आलेल्या रंगरंगोटी कामाची पहाणी करुन काम पूर्ण झाले याबाबत शाखा अभियंता यांचा अहवाल व वर्क ऑर्डरची छायांकित प्रत मिळण्यास विनंती आहे.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही यामुळे अपीलकाराने प्रथम अपील केले. परंतु प्रथम अपील दाखल करुन घेतले नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलर्कीराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, तिवरे गावच्या रस्त्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमक्ष अपीलकारास माहिती पुरविली.

अपीलकारास पुरविलेल्या माहितीचा एक संच आयोगास सादर केला. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांक २६.३.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४८३/०२**

**श्री. सुभान शंकर पेडणेकर,**
**एन.जी.पार्क बिल्डिंग नं.२/सी/४०५,**
**दहिसर(पूर्व), मुंबई-४०००६८. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा तहसिलदार,**
**ता.सावंतवाडी,**
**जि.सिंधूदूर्ग.**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायक तहसिलदार,**
**ता.सावंतवाडी,जि.सिंधूदूर्ग.**
**..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. सुभान पेडणेकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.१.०९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती :-

बोटखताचा उतारा मिळणेबाबत मौजे आरोंदा,ता.सावंतवाडी,जि,सिंधूदूर्ग येथील जुना स.नं.१९० नवीन स.नं.१११/३ व १११/१४ चा जुने १९०५ पासून ते आजपर्यंतचा बोटखताचा उतारा पत्रकाची नक्कल मिळणेबाबत. कायदेशिर वारसांच्या संमतीशिवाय जमीन मालक बदलल्याबाबत.

जन माहिती अधिका-यांनी बोटखताचा उतारा पेडणेकर ऐवजी रुखमणी औरत बाळकृष्ण केरजी या आडनावाचा म्हणजे चुकीचा दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१५.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी माहिती दिली नाही. सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीयअपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन बोटखताच्या उता-याबाबत माहिती मागीतली होती. बोटखतात दुरुस्ती करण्याची अपीलकाराची मागणी होती. बोटखताची प्रत अपीलकारास देण्यात आली असल्याचे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली आहे. या परिस्थितीतीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/३५८४/०२**

**श्रीमती जयंतीलाल व्ही.व्होरा,**
**द्वारा-खिमजी के. शहा,**
**ब्लॉक नं.४,२रा मजला, मेघदूत इमारत,**
**२८३,फ्लँक रोड, किकाभाई रुग्णालयासमोर,**
**गांधी मार्केटजवळ, किंग्ज सर्कल,**
**सायन, मुंबई-४०००२२. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था,मुंबई(१) शहर, मल्होत्रा हाऊस,६वा मजला,**
**जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था अे विभाग, मुंबई,**
**मल्होत्रा हाऊस,६वा मजला,**
**जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्रीमती जयंतीलाल व्ही.व्होरा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.९.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.२.०९ रोजी अर्ज करुन सिध्दी विनायक सहकारी गृहनिर्माण संस्था लि. बाबत विविध मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.७.७.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.१.९.०९ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केले.

मुद्दा क्रमांक १ साठी म्हणजेच प्रॉपर्टी कार्ड, या कार्यालयात ठेवले जात नसल्याने त्याबाबतीत आपण संबंधित कार्यालय म्हणजेच महसूल विभागाच्या कार्यालयाकडे संपर्क साधून त्या कार्यालयातून प्राप्त करुन घ्याव्यात.

मुद्दा क्र.२ साठी म्हणजेच या कार्यालयात उपलब्ध असलेले ताळेबंदपत्रक व लेखापरीक्षण अहवाल प्राप्त करुन घ्यावेत.

मुद्दा क्र.३ साठी सदरची माहिती या कार्यालयात ठेवली जात नाही.

मुद्दा क्र.४ च्या माहितीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था व नियम व संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही कारवाई करण्यात येऊ शकेल.

मुद्दा क्र.५ साठी संस्थेने कोणते चार्जेस घ्यावेत याबाबत शासनमान्य आदर्श उपविधीमध्ये तरतूद आहे.

मुद्दा क्र.६ हा मुद्दा या कार्यालयाशी संबंधीत नाही.

मुद्दा क्र.७ यामध्ये या कार्यालयाचे कारणमिमांसा व मत विचारले आहे. माहितीच्या अधिकारामध्ये अपेक्षित नाही.

मुद्दा क्र.८ सदरचा मुद्दा या कार्यालयास लागू नाही

मुद्दा क्र.९ मा.अपीलीय अधिकारी यांचे नाव व पत्ता खालीलप्रमाणे आहे.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सिध्दीविनायक सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत विविध मुद्यांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, संस्थेच्या ताळेबंदपत्राची प्रत,संस्थेच्या सभासद मंजूरीच्या निर्णयाची प्रत जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी.

सदर प्रकरणी सिध्दीविनायक संस्थेसंबंधीची आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता अपीलकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम २२ अनुसार सक्षम अधिका-याकडे मागणी करावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांक २६.३.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/३१७९/०२**

**श्रीमती पार्वती नर्सी शहा,**
**फ्लॅट नं.४,मा-बेल मॅन्शन,**
**सेंट्रल ॲव्हेन्यू रोड, चेंबूर,**
**मुंबई-४०००७१. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**मुंबई प्रादेशिक विद्युत मंडळ,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रशासकीय इमारत,**
**३रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग,**
**चेंबूर(पूर्व), मुंबई-४०००७१.**

**जन माहिती अधिकारी तथा विद्युत निरिक्षक,**
**सांताक्रुझ निरिक्षण विभाग, बॅरॅक्स बि.नं.६२च्या समोर,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्रीमती पार्वती नर्सी शहा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.९.६.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.१.०९ रोजी अर्ज करुन खाजगी विद्युत पुरवठादार कंपनी मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. कंपनीच्या कामासंबंधी एकूण १२ मुद्यांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथमअपीलीय अधिका-याकडे दि.२.३.०८ रोजी प्रथमअपील दाखल केले. सदर प्रथम अपीलास अनुसरुन दि.९.४.०९ च्या पत्रान्वये कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, विद्युत पुरवठादार रिलायन्स कंपनीच्या कामकाजाबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांकडे उपलब्ध नाही. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविली आहे. माहिती गोळाकरुन अपीलकारास पुरवावी अशी अपीलकाराची मागणी आहे. माहितीच्या अधिकारानुसार माहिती गोळा करुन अपीलकारास पुरविण्याची अपीलकाराची मागणी मान्य करता येणार नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांक २६.३.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४११/०२**

**श्री. वामन विष्णू चव्हाण,**
**७६/ई, लोकोत्कर्ष,भवानी गेट,**
**मंगल सोसायटी जवळ,र.अ. किडवाई मार्ग,**
**माटुंगा, मुंबई-४०००१९.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/उत्तर विभाग कार्यालय,**
**माटुंगा, मुंबई-४०००१९.**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी,**
**सार्वजनिक आरोग्य खाते,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/उत्तर विभाग कार्यालय,**
**माटुंगा, मुंबई-४०००१९.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.वामन विष्णू चव्हाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१२.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती:-

लोकोत्कर्ष वाचनालय आणि पान-विडी-चहा-नास्ता विक्रीसाठी मी १९८२-८३ साठी मालमत्ता विभाग यांचे ना-हरकत प्रमाणपत्र आपल्या विभागाला सादर करन सदर बाबत परवाना मिळवण्यासाठी आपल्या विभागात अर्ज सादर केला. त्यामळे आपल्या विभागाने मला अर्जासोबत सादर केलेली परवाना पत्रे मंजूर करुन दिली. त्याचे वार्षिक आकार मी आजपर्यंत भरत आहे.सदर परवाना पत्रात काही त्रुटी अल्यामुळे मी आपल्या विभागास १) १९ ऑगस्ट,२००४ २) एक खिडकी संदर्भ क्र. एफएन २/००२७ दि.१५.१२.२००६ रोजी अर्ज केले. सदर अर्जाची आजपर्यंत दखल घेतलेली नाही. तसेच खोटया तक्रारी वरुन मला आपल्या विभागाकडून सतावले जाते.

१)सदर दोन्ही अर्जाबाबत आपल्या विभागाने काय कारवाई केली याबाबत माहिती द्यावी.

२) मी १९८२-८३ साली केलेल्या अर्जाची तसेच विभाग अधिकारी मालमत्ता खाते यांनी दिलेले ना-हरकत प्रमाणपत्राची प्रमाणित नक्कल प्रत उपलब्ध करुन देणे

३) सदर परवान्यात राहिलल्या त्रुटी मी आपल्या विभागात सादर केलेल्या परवाना मागणी अर्जात नमूद असलेल्या विक्री वस्तू परवान्यात नोंद करुन पुरवाव्यात.

४)माझ्या व्यवसायाविरुध्द कुणी खोटया तक्रारी दिल्या असतील त्यांची प्रमाणित प्रत मला उपलब्ध करुन द्यावी.

अपीलकाराने मागणी केलेली कागदपत्र उपलब्ध नाहीत असे जन माहिती अधिका-याने अपीलकारास दि.३१.८.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने दि.२६.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.१८.११.०९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते,अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराच्या दुकानाच्या व्यवसायी परवान्यात नमूद न कलेल्या, राहून गेलेल्या त्रुटी पूर्ण कराव्यात म्हणून अर्ज करुन अनुषंगिक माहिती मागीतली होती. महानगरपालिकेच्या प्रचलित पध्दतीनुसार अनुज्ञापत्रासाठी केलेला अर्ज व त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा दस्तऐवज हे एक वर्षाच्या कालावधीसाठी जतन करण्यात येतात असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकाराच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. त्यामुळे अपीलकाराने मागीतलेल्या दि.१९.८.०४व दि.१५.१२.०६ ला कलेल्या अर्जाच्या प्रती व इतर पत्रव्यवहार कार्यालयात उपलब्ध नाहीत असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी नमूद करुन दि.१८.११.०९ रोजी प्रथम अपीलावर आदेश पारित केले आहेत. द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यानी सर्व संबंधीत कागदपत्र उपलब्ध नसल्याने अपीलकारास माहिती पुरविता येत नसल्याचे प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई<br>
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**<br>
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४१२/०२**

**श्री. अब्राहम फझूर,**
**३६७,आदर्श नगर, लिंक रोड,**
**ओशिवरा, जोगेश्वरी(प.),**
**मुंबई-४०००१२. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अधिकारी,**
**(मि.व्य.-२)मुंबई मंडळ, मुंबई गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**१ला माळा, खोली क्र.२०२, गृह निर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व),मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-२,**
**मुंबई गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**१ला माळा, खोली क्र.२०२, गृह निर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व),मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. अब्राहम फझूर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.७.२००९ रोजी अर्ज करुन म्हाडाचे किती निवासी गाळयाचे व्यापारी गाळयात रुपांतरित करण्यात आले आहेत याबाबत मार्च-२००८ पासूनची अद्यावत अनुषंगिक सविस्तर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१५.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन म्हाडाने निवासी गाळयांचे व्यापारी गाळयात रुपांतरीत केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविलेली नाही. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोठे असल्याने त्याकरीता १००० फाइल्सवरुन माहिती काढणे आवश्यक असल्याचे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५५७/०२**

**श्री. जयप्रकाश सोपान कारंडे,**
**रेल्वे पोलीस कॉलनी, बि.नं.१९,**
**खो.नं.४७, सी विंग, पंतनगर,**
**घाटकोपर(पूर्व), मुंबई-४०००७५ ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अपर निबंधक(वसुली व नियोजन),**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, नवीन मध्यवर्ती इमारत,**
**पुणे -१.**

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, पंतनगर सिध्दिविनायक को.ऑप.हौ.सो.,**
**हिंगवाला लेन, पंतनगर, घाटकोपर(पूर्व),**
**मुंबई-४०००७५**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी गृहनिर्माण संस्था(म्हाडा),**
**गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, १ला मजला, वांद्रे(पूर्व),**
**मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

## विवेचन

अर्जदार श्री. जयप्रकाश सोपान कारंडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.४.२००७ रोजी अर्ज करुन पंतनगर सिध्दीविनायक संस्थेने अपीलकाराची संमती नसतांना त्यांची खोली परस्पर हस्तांतरीत केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी पूर्वी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नव्हती. अपीलकारास माहिती पुरविली नाही. म्हणून आयोगाकडे क्र.१७२३/०२ हे द्वितीय अपील केले होते. सदर प्रकरणी ४५ दिवसांचे आत सुनावणी आयोजित करुन उचित आदेश पारित करावेत

असे आयोगाने दि.११.२.०९ रोजी प्रथम अपीलीय अधिका-यांना आदेशित केले होते. त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन पंतनगर सिध्दीविनायक संस्थेने अपीलकाराची संमती नसतांना त्यांची खोली परस्पर हस्तातांतरित केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, अपीलकाराची सदनिका, त्यांच्या संमतीविना पंतनगर सिध्दीविनायक संस्थेने ज्या कागदपत्रांच्या आधारे हस्तांतरित केली त्यासंबंधीची सर्व संबंधीत कागदपत्र हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास उपलब्ध करुन द्यावीत.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांक २६.३.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५६१/०२**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे,**
**२०४,राजबाग, दलुचंद को.ऑप.हौ.सोसायटी,**
**२७१, सर भाचलंद्र मार्ग, माटुंगा,**
**मुंबई-४०००१९.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप प्रमुख अभियंता(इमारत प्रस्ताव)शहर,**
**ई विभाग महापालिका कार्यालय, ३रा मजला,**
**शेख हाफीजुद्दीन मार्ग, भायखळा,**
**मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारत प्रस्ताव)शहर-२,**
**ई विभाग महापालिका कार्यालय, ३रा मजला,**
**शेख हाफीजुद्दीन मार्ग, भायखळा,**
**मुंबई-४००००८.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. प्र यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.१०.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३.६.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)बदली अंतर्गत कायद्यान्वये शासकीय कर्मचा-यांचे बदली अधिनियम व विलंब टाळणेबाबतचा अधिनियम याच्याप्रमाणे पो.नि. दराडे यांचेवर कोणती व कशा स्वरुपाची कारवाई झाली आहे? कारवाई झाली नसल्यास कारणे

२) विहित मदतीत कारवाई झाली असल्याचे अर्जदारास गृह विभागाकाडून का कळविण्यात आले नाही? कारण

३) कारवाई न होणेस जबाबदार अधिका-यांवर कोणती व कशा स्वरुपाची कारवाई करणार अथवा केली?

४) मुद्दा नं.१ मधील नमूद कायद्याचे पालन केलेले आहे का? नसल्यास कारण त्यांचेवर (संबंधित पालन न करणारे) कोणती कारवाई केली? नसल्यास का?

जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित नव्हते,जन माहिती अधिकारी उपस्थित होते. सुनावणीचेवेळी उ त्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, बदली कायद्यानुसार पोलीस निरिक्षक श्री.दराडे यांचेवर कोणती व कशा स्वरुपाची कारवाई झाली याबाबतअनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली आहे. या प्रकरणी अपीलकाराने केलेल्या तक्रारीसंबंधी उत्तरवादीने केलेले प्रतिपादन लक्षात घेता अपीलकाराच्या तक्रारीत तथ्य आढळून येत नाही.या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांक २६.३.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५५६/०२**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे,**
**२०४,राजबाग, दलुचंद को.ऑप.हौ.सोसायटी,**
**२७१, सर भाचलंद्र मार्ग, माटुंगा,**
**मुंबई-४०००१९.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप प्रमुख अभियंता(इमारत प्रस्ताव)शहर,**
**ई विभाग महापालिका कार्यालय, ३रा मजला,**
**शेख हाफीजुद्दीन मार्ग, भायखळा,**
**मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारत प्रस्ताव)शहर-२,**
**ई विभाग महापालिका कार्यालय, ३रा मजला,**
**शेख हाफीजुद्दीन मार्ग, भायखळा,**
**मुंबई-४००००८.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. प्रकाश गोविंद नवाथे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.९.२००९ रोजी अर्ज करुन दि.१४.७.२००५ रोजीच्या २७०अे प्रमाणपत्रामध्ये खालील दोन गोष्टी समावेशाबाबत मागणी केली होती.

१)Plans are passed under No.EB/६४८६/एफएन दि.२९.४.०२

२)O.C. is granted under even n no.on १६.९.०४

सदर बाबी आपल्या कोणत्या खात्याकडून किंवा कोणत्या व्यक्तीकडून कळविण्यात आल्या याची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१४.९.०९ व दि.९.१०.०९ रोजी माहिती पुरविली. पुरविलेली माहिती समाधानकारक नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.३.१०.०९ रोजी आदेश

पारित केले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविलेली माहिती समाधानकारक नाही असा अपीलकाराने द्वितीय अपीलात मुद्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(जल अभियंता) एफ/एन विभाग यांनी अपीलकारास माहिती द्यावी. अपीलकाराने दि.१४.७.२००५ रोजी दिलेल्या पत्रावर निर्माण केलेल्या संबंधीत फाईल्सच्या कागदपत्राच्या प्रती अपीलकारास द्याव्यात.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५५९/०२**

**श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले,**
**सिध्दीविनायक प्रसाद,**
**डॉ.शामाप्रसाद मुखर्जी रोड,**
**डोंबिवली(पूर्व), पिन-४२१२०१,**
**ता.कल्याण, जि.ठाणे. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा गृहनिर्माण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा गृहनिर्माण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.१०.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.७.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती:-

१)मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण गठीत न करण्याबाबतच्या कारणांची माहिती मिळावी

२)मा.उच्च न्यायालयाचे आदेश आपणास बंधनकारक आहेत अथवा कसे याबाबत माहिती मिळावी

३)संबंधीत प्राधिकरण गठीत करणेबाबत तसेच मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाबाबत अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ज्या अधिका-यावर निश्चित वा सोपविली होती त्या अधिका-यांचे नाव व पद याबाबत माहिती मिळावी

४)कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्रात एकूण किती झोपडपट्टया घोषित आहेत त्याबाबतची माहिती मिळावी व घोषित नसल्यास तशी माहिती मिळावी तसेच झोपडपट्टयाच नसल्यास तशी माहिती मिळावी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.५.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण गठीत न करण्याबाबतच्या कारणाची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून१५ दिवसांचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५६०/०२**

**श्री. अर्जूनलाल छाब्रिया,**
**१५,बेला व्हीस्टा,एस.व्ही रोड,**
**बांद्रा(प.), मुंबई-४०००५० ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा उप सचिव,**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. अर्जूनलाल छाब्रिया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२.१.२०१० रोजी अर्ज करुन श्री.मयूर सी.पारीख, मेसर्स एम.आर.एंटरप्रायझेस, शॉप क्र.५, ठक्कर बाप्पा कॉलनी, कुर्ला(पूर्व), मुंबई यांच्या विरुध्द दि.२२.६.२००९ रोजी वैयक्तिक तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन दि.२२.६.२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती

दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती अपीलकारास पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५६३/०२**

**श्री. डी.के.चौधरी,**
**बी/२९, लक्ष्मी साई, सखाराम नगर,**
**डोंबिवली(प.), जि.ठाणे-४२१२०२. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा प्रो.एस.आर.शुक्ला,**
**इन्स्टिटयूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी,**
**मफतलाल पारेख मार्ग, माटुंगा,**
**मुंबई-४०००१९.**

**जन माहिती अधिकारी तथा श्री.के.एम.घोडके,**
**इन्स्टिटयूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी,**
**मफतलाल पारेख मार्ग, माटुंगा,**
**मुंबई-४०००१९.. ..... उत्तरवादी**

## विवेचन

अर्जदार श्री. डी.के. चौधरी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१०.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.८.०९ रोजी अर्ज करुन महाराष्ट्र नागरी सेवा(सुधारित वेतन) नियम २००९ मधील नियम १५ अनुसार कर्मचारी/अधिका-यांची दि.१.१.०६ ते ३१.३.०९ या कालावधीची वेतन फरकाची रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करावयाची आहे. तसेच सदर फरकाची भ.नि.नि.खात्यात जमा केल्यावर त्याचा आयकर अधिनियमातील कलम ८०सी अनुसार लाभ देण्याबाबत तरतूद आहे. परंतु संस्थेने कायम कर्मचा-यांची भ.नि.नि.खाती उघडली नाहीत. तेव्हा नियम १५ ची कशी अंमलबजावणी करणार. कर्मचा-यांचे भ.नि.नि.खाते कधी उघडणार याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. संस्थेतील सर्व कायम कर्मचा-यांची भविष्यनिर्वाह निधी खाते उघडण्याबाबतचा विषय विचाराधीन असून सदर प्रकरणी आवश्यक ती कारवाई संस्थेमार्फत करण्यात येईल असे दि.२३.९.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२५.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी

अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास दि.१६.१०.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते,अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सहाव्या वेतन आयोगाची वेतन फरकाची रक्कम भ.नि.नि. खात्यात जमा करण्याबाबत नियमात तरतूद आहे. संस्थेने कर्मचा-यांचे भ.नि.नि.खाते उघडले नाही. याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, अपीलकाराची सहाव्या वेतनआयोगाच्या फरकासंबंधीची रक्कम जमा करण्यासाठी भ.नि.नि.खाते उघडण्याचा रसायन तंत्रज्ञान संस्थेने निर्णय घेतल्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती द्यावी. संस्थेतील कोणत्याच कर्मचा-यांची वेतन फरकाची रक्कम भ.नि.नि.खात्यात जमा करण्यासाठी वैयक्तिक भ.नि.नि.खाते उघडण्याबाबत संस्थेने अद्याप निर्णय घेतलेला नाही. अपीलकाराचे प्रकरण बाजूला राहून जाऊ नये यासाठी यासंबंधी भ.नि.नि.खाते उघडण्याचा कर्मचा-यांचा दावा निश्चित झाल्यानंतर अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५६२/०२**

**श्री. मनोहर सखाराम देसाई,**
**वरद लक्ष्मी,४था मजला,**
**खोली क्र.४०६, गोखले मार्ग,**
**मुलुंड(पूर्व), मुंबई-४०००८१. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप प्रमुख अभियंता(इमारत प्रस्ताव)पू.-३,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पूर्व उपनगरे यांचे कार्यालय,**
**पेपरमिल कंपाऊंड, राज लिगसी जवळ,**
**एल.बी.एस.मार्ग.विक्रोळी(पूर्व),**
**मुंबई-४०००८३.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारत प्रस्ताव),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पूर्व उपनगरे यांचे कार्यालय,**
**पेपरमिल कंपाऊंड, राज लिगसी जवळ,**
**एल.बी.एस.मार्ग.विक्रोळी(पूर्व),**
**मुंबई-४०००८३. ..... उत्तरवादी**

## विवेचन

अर्जदार श्री. मनोहर सखाराम देसाई यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१३.७.०९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे पत्र क्रमांक सीइ/३०४९/बीपीईएस/एटी/१४ मे,१९८५ च्या पत्रात नमूद केलेल्या १ ते ९ शर्तीची कशी पूर्तता(अंमलबजावणी) केली सदरबाबत संपूर्ण सविस्तर तपशीलवार माहिती देण्यात यावी. त्याचप्रमाणे शर्त क्रमांक ७ मध्ये उल्लेखीत केल्याप्रमाणे कन्व्हेअन्स डीड ची प्रमाणित प्रत देण्यात यावी. संपूर्ण सविस्तर तपशीलवार माहिती व कन्व्हेअन्स डीडची प्रमाणित प्रत देण्यासाठी पत्र क्र. सीइ/३०४९/बीपीईएस/एटी, दि१४ मे,१९८५च्या पत्राची प्रत कारवाईसाठी जोडलेली आहे.

कार्यालयात असलेल्या अभिलेखाप्रमाणे नस्ती क्रमांक सीइ/३०४९/बीपीईएस/एटी चा सदर कार्यालयात शोध घेतला असता सदर नस्ती अभिलेख कक्षात उपलब्ध नाही. त्यामुळे अपीलकारास हवी असलेली माहिती पुरविणे शक्य होत नाही. संबंधीत इमारतीच्या मंजूरीसंबंधी काही अधिक माहिती उपलब्ध झाल्यास आपणास कळविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१८.८.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे दि.४.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावर दि.८.१०.०९, १६.१०.०९, २३.१०.०९ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकार प्रथम अपीलावरील सुनावणीकरिता हजर झाले नाहीत. जन माहिती अधिका-यांनी पुन्हा संबंधित नस्तीचा शोध घेऊन अपीलकारास ३० दिवासाचे आत माहिती पुरवावी असे दि.२८.१०.०९ रोजी प्रथम अपीलावर आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने व्यथीत होऊन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीची नस्ती सापडत नसल्याने अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविता आली नसल्याचे द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी उत्तरवादीने प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी संबंधीत कागदपत्रांचा कसून शोध घ्यावा व अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५७४/०२**

**श्री.वेदप्रकाश पांडे,**
**साईकृपा कॉम्प्लेक्स,शैलेश को.ऑप.हौ.सो.,**
**४था मजला, ब्लॉक नं.४०२, काशीमीरा(पूर्व),**
**जि.ठाणे. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा शिक्षण निरिक्षक,**
**शिक्षण निरिक्षक कार्यालय, जोगेश्वरी(पूर्व),**
**मुंबई-४०००६०**

**जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरिक्षक,**
**शिक्षण निरिक्षक कार्यालय, जोगेश्वरी(पूर्व),**
**मुंबई-४०००६० ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. वेदप्रकाश पांडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.३.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.७.१२.२००८ रोजी अर्ज करुन श्रीम. मनीबेन डांगिया या आचार्य नरेंद्रदेव हिंदी हायस्कूल, वजीरा नाका, बोरीवली, मुंबई येथे चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून नेमणूकीस होत्या त्यांचे पेन्शन फंड व ग्रॅच्युटी मिळण्याबाबत मागणी केली. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सेवानिवृत्ती लाभ मिळण्याबाबत मागणी केली होती. परंतू अपीलकाराने सेवानिवृत्ती संबंधीच्या कागदपत्रांवर सहया करुन कार्यालयात सादर केल्या नाहीत यामुळे अपीलकारास

सेवानिवृत्ती लाभ अदा करता आले नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी आयोगासमोर प्रतिपादन केले. सेवानिवृत्ती लाभासंबंधीच्या कागदपत्रांवर अपीलकाराने दि.३१.३.२०१० रोजी सहया कराव्यात. जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराची सेवानिवृत्ती लाभासंबंधीची सर्व कागदपत्र भरुन ती सेवानिवृत्ती लाभ मंजूरीसाठी सक्षम प्राधिकरणाकडे तात्काळ पाठवाव्यात. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५७५/०२**

**श्रीमती शबनम महमद समी शेख,**
**रुम नं.३०१, ५१, एप्रिल शॉवर सॉटर स्ट्रीट,**
**भायखळा, मुंबई-४०००००८. .** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता(बी.पी.)शहरे,**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर बॉंबे,**
**ई वार्ड ऑफीस, भायखळा,**
**मुंबई-४०००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(बी.पी.)शहरे,**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर बॉंबे,**
**ई वार्ड ऑफीस, भायखळा,**
**मुंबई-४०००००८.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्रीमती शबनम महमद समी शेख यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.६.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१.१२.२००८ रोजी अर्ज करुन सी.टी.सर्व्हे क्र.१५८९ भायखळा येथील मालमत्तेचा पुर्नविकास करण्यासंबंधी

१)नकाशाची प्रत
२)मंजूर एफ.एस.आय.
३) वापरलेला एफ.एस.आय.
४) दि.१.१२.०८ रोजी प्रमाणित काम
५) सदनिकाधारकांची संख्या
६)सीसी/०८ ची स्थिती
७)इमारतीची सद्यस्थिती

इत्यादी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२२.१२.०८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले की, इमारत बांधकामासाठीची फाईल कार्यालयात उपलब्ध आहे. सदर फाईलचे अपीलकाराने प्रथम निरिक्षण करावे. त्यानंतर निवडक कागदपत्रांची मागणी करावी. विहित शुल्क भरल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल. आवश्यक माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.६.१.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.३.३.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अपीलकाराने सी.टी.सर्व्हे क्र.१५८९ भायखळा येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकारास माहिती पुरविण्याबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई सुरु करण्यात येईल.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई — **(रामानंद तिवारी)**
दिनांक २६.३.२०१० — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५६४/०२**

**श्री.सुधीर प्रभाकर चव्हाण,**
**छत्रपती शिवाजीराजे संकूल,**
**सुयोग को.ऑप.हौ.सो.लि.,इमरत क्र.५,सदनिका क्र.२०१,**
**२रा माळा,सेवंतीलाल खांडवाल मार्ग**
**कांदिवली(प.), मुंबई-६७ ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहमुख्य अधिकारी(पुनर्रचित गाळे),**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, २रा माळा, गृहनिर्माण भवन,**
**कला नगर, वांद्रे(पूर्व),मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी(पुनर्रचित गाळे),**
**२रा माळा कक्ष क्र.३७२, गृहनिर्माण भवन,**
**कला नगर, वांद्रे(पूर्व),मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. सुधीर प्रभाकर चव्हाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.११.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.५.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती :-

मंडळाच्या ग्रँट रोड(प.),नौशिर भरुचा मार्ग, मुंबई-४०० ००७ येथील नवी चिखलवाडी मधील इमारत -रचना-४-अ मधील सदनिका क्र.१०६ संदर्भात खालील तीन मुद्यांबाबतची माहिती मला देण्यात यावी.

१)प्रश्नाधिन सदनिकेच्या मूळ धारकाचे संपूर्ण नाव

२) प्रश्नाधिन सदनिकेच्या सध्याच्या धारकाचे संपूर्ण नाव

३)त्याचप्रमाणे सध्या प्रश्नाधिन सदनिकेमध्ये वास्तव्य करीत असलेल्या कुटूंबाच्या प्रमुखाचे संपूर्ण नाव

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथत अपीलीय अधिका-याकडे दि.३.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी खालीलप्रमाणे अपीलकारास दि.२८.१०.०९ च्या पत्रान्वये कळविले.

श्री.सुधाकर रघुनाथ चव्हाण यांनी मा.तहशीलदार,राजापूर यांच्याकडील दि.११.१२.०३ चा दाखला सादर केला आहे. तसेच भास्कर रघुनाथ चव्हाण यांचे प्रतिज्ञापत्र आणि सुरेखा मनोहर सरफरे(कु.प्रेमा रघुनाथ चव्हाण) श्रीम. नंदिनी दिलीप विश्वासराव(कु.छबीला रघुनाथ चव्हाण)यांनी दि.१८.१२.०३ च्या प्रतिज्ञापत्राद्वारे सदरहू गाळा श्री. सुधाकर रघुनाथ चव्हाण यांचे नावे करण्यास नाहरकत दिली असल्याने व कागदपत्रांची पूर्तता केल्याने या कार्यालयाचा दि.२४.८.०४च्या पत्राद्वारे गाळा हस्तांतरण आदेशाद्वारे सदरहू गाळा श्री.सुधाकर रघुनाथ चव्हाण यांच्या नावे करण्यात आलेला आहे.१)मूळ भाडेकरु श्री.नारायण अमृत चव्हाण आहेत. २) सध्याचे रहिवाशी श्री.सधाकर रघुनाथ चव्हाण आहेत.

मागीतलेली माहिती न देता दिशाभूल करणारी,खोटी त्याचप्रमाणे चुकीची,अपुरी,अर्धवट माहिती दिली असल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित नव्हते.

सदर प्रकरणी अपीलकारास उत्तरवादीने माहिती पुरविली असल्याचे अपीलकाराने दि.२२.३.२०१० रोजी आयोगास लेखी निवेदन सादर करुन कळविले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांक २६.३.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५६८/०२**

**श्री. दत्ता एस.माने,**
**ॲडव्होकेट हायकोर्ट,**
**१८-ए/७०४, बिंबिसार नगर,जयकोचच्या समोर,**
**गोरेगाव(पूर्व), मुंबई-४०००६५. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**परिमंडळ १२, शैलेंद्र नगर, दहिसर मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**उत्तर नियंत्रण कक्ष,ठाकूर व्हीलेज,**
**कांदीवली(पूर्व), मुंबई४००१०१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. दत्ता माने यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.११.२००९ रोजी अर्ज करुन श्री.इकबाल इम्तीयाज शेख उर्फ इकबाल चरशी, जीवन-ज्योती सोसायटी फ्लॅट नं.२०१, राम मंदिर रोड, गोरेगाव-पश्चित, मुंबई-६२ यांचे विरुध्द गोरेगाव पोलीस ठाण्यात दाखल गुन्हयासंबंधीची अनुषंगिक सविस्तर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत मागणीप्रमाणे माहिती पुविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.१८.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकार प्रथम अपीलावरील सुनावणीकरीता हजर राहिले नाहीत. त्यांनी त्यांच्या प्रतिनिधीला सुनावणीकरीता पाठविले. अपीलकाराने मागणी केलेली माहिती तयार असून अपीलकारानी आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी कार्यालयातून घेऊन जावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते, सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन श्री.इकबाल इम्तीयाज शेख विरुध्द पोलीस ठाणेत केस दाखल करण्यात आली याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती वैयक्तिकरित्या कार्यालयातून प्राप्त करुन घे्णार असल्याचे अर्जात नमूद केले होते. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी आवश्यक माहिती तयार करुन ठेवली होती. परंतु अपीलकाराने कार्यालयात हजर राहून माहिती प्राप्त करुन घेतली नाही असे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती द्यावी. माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळवावे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५६९/०२**

**श्रीमती मार्था सेबेस्टीयन**
**१९९, भवानी शंकर रोड,**
**दादर, मुंबई-४०००२८. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई,**
**जी/नॉर्थ वार्ड ऑफीस, हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर(प.), मंबई-४०००२८**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(टाऊन प्लॅनींग),**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई,**
**जी/नॉर्थ वार्ड ऑफीस, हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर(प.), मंबई-४०००२८ ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्रीमती मार्था सेबेस्टीयन यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२.६.२००९ रोजी अर्ज करुन सी.टी.सर्व्हे क्र.१३०९, एफपी क्र.५६९(पार्ट)टीपीएस IV माहिम विभाग येथील Our lady of savation चर्च, दादर नावाचा प्लॉट टाऊन प्लॅनींगच्या सन १९६३ च्या कागदपत्रावरुन हा प्लॉट केव्हा आणि कोणत्या वर्षी संपादित करण्यात आला, प्लॉट संपापदनासंबंधीची सर्व कागदपत्र, सदर संपादित केलेला प्लॉट केव्हा अनारक्षित करण्यात आला याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.९.७.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.३१.७.०९ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी दि.१९.६.०९च्या पत्रानुसार अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे आदेशात नमूद करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे अपीलकाराने द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होत. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन Our lady of salvation नावाचा प्लॉट संपादित केल्याबाबत व तो अनारक्षित करण्याबाबत आवश्यक ती माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध आहे ती अपीलकारानी कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावी. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास ३० दिवसाचं आत माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५७०/०२**

**श्री.अरुण विष्णू कोदे,**
**मु.पो.कुवळे, व्हाया शिरगांव,**
**ता.देवगड, जि. सिंधूदूर्ग. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपायुक्त(सा.प्र.),**
**बृहनमुंबई महानगरपालिका,**
**मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लेखापाल(कोषागार)**
**बृहनमुंबई महानगरपालिका,**
**मुंबई ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. अरुण विष्णू कोदे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले.

अपीलकार श्री.अरुण विष्णू कोदे यांनी दि.५.११.१९९७ रोजी न्यु सायन महापालिका माध्यमिक शाळा,सायन, मुंबई येथून लिपिक पदावरुन स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतली. अपीलकारास सेवानिवृत्ती लाभ मर्यादेपलिकडे विलंबाने मिळालेले आहेत. म्हणून अपीलकाराने खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)दि.२६.४.०७ रोजी अपीलकाराची वकीलामार्फत पाठविलेली नोटी.

२)माहितीच्या अधिकारात दि.२४.३.०८, ३०.११.०८ च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती.

३) ग्रॅच्युईटीची रक्कम मे-०८ मध्ये अदा केली. धनादेश अपीलकाराने स्विकारले नाहीत म्हणून व्यपगत झाले हे चुकीचे आहे. कार्यालयातील कोणत्याही ऑफीसरने धनादेश स्विकारण्याविषयी कळविलेले नाही. तशाप्रकारची अपीलकाराकडून पोच घेतली असेल तर त्याची प्रत द्यावी.

४) पेन्शन पुस्तक अद्यावत करुन द्यावे.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास खालीलप्रमाणे माहिती दिली.

अ) मृत्यू-नि-उपदानाची रक्कम(D.C.R.G.)रु.५१,४१७/- प्रमाणित करुन त्यामधून आस्थापना वसुली रु.२,६८४/-वसुल केल्यावर उर्वरित रक्कम रु.४८,७३३/- एवढया रकमेचा धनादेश क्र.९०९१९ काढण्यात आलेला होता परंतु तो स्विकारण्यासाठी आपण उपस्थित न राहिल्याने दि.७.७.२००० रोजी व्यपगत झालेला होता.

ब) पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे आपणास एकण रु.१०,४११/- ची थकबाकी ही इ.एफ.एस.पी./२८/२००१-२००२ अन्वये प्रमाणित करुन त्यामधून आय.आर.ची वसुली रु.३,०००/- वजा केल्यावर रु.७,४११/- चे अधिदान धनादेश क्रमांक ६६४८३६ हा दि.९.११.२००१ अन्वये झालेले असून सदर धनादेश आपण त्यावेळी स्विकारलेला आहे.

क) पाचव्या वेतन आयोगानुसार आपले मासिक निवृत्तीवेतन सुधारित करुन दि.१.६.२००२ पासूनआपणास सुधारित निवृत्तीवेतन देण्यात येत आहे. तसेच पाचव्या वेतन आयोगानुसार सुधारित मासिक निवृत्ती वेतनाची थकबाकी एप्रिल महिन्याच्या मासिक निवृत्ती वेतनासोबत देण्यात येईल. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| | |
|---|---|
| १)पाचव्या वेतन आयोगानुसार मृत्यू-नि-उपदानातील फरकाची रक्कम | रु.३४,१३३/- |
| २)पाचव्या वेतन आयोगानुसार मासिक निवृत्ती वेतनातील दि.५.११.९७ ते ३१.५.२००२ या कालावधीसाठी फरकाची रक्कम | रु.३४३२६/- |
| ३) पदोन्नतीमुळे मासिक निवृत्तीवेतनातील फरकाची रक्कम | रु.२१,०२२/- |
| | एकूण रु. ८९,४८१/- |

ड)पदोन्नतीमुळे मिळणा-या फरकाची रक्कम७,८०३/- आपणास देय असून त्याचा धनादेश क्र.९१४०५१ दि.३१.३.२००४ रोजी काढलेला होता परंत आपण तो न स्विकारल्यामुळे दि.९.७.२००४ रोजी व्यपगत झालेला होता.

वरील “अ” व “ड”वरील दोन्ही धनादेश नव्याने काढण्यात आले असून रु.४०,७३३/- चा धनादेश क्रमांक ३१४६३३ दि.२३.४.२००८ व रु.७,८०३/- चा धनादेश क्रमांक ३२४०४८ दि.१.४.२००८ असून सदर दोन्ही धनादेश स्विकारण्यासाठी प्रमुख लेखापाल(कोषागार) यांच्या अधिपत्याखालील मुख्य कार्यालय, जुनी इमारत येथे रोख विभागाशी संपर्क साधून ते त्वरीत स्विकारावेत.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२९.५.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीसाठी उत्तरवादी व अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

मृत्यू-नि-उपदानाची रक्कम (D.C.R.G.)रु.४८,७३३/- एवढया रकमेचा धनादेश काढण्यात आला होता परंतू तो स्विकारण्यासाठी अपीलकार कार्यालयात उपस्थित न राहिल्याने दि.७.७.२००० रोजी व्यपगत झाला. पदोन्नतीमळे मिळणा-या फरकाच्या रकमेचा धनादेश

दि.३१.३.०४ रोजी काढला होता परंतु तो अपीलकाराने स्विकारला नसल्याने व्यपगत झाला होता असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले आहे. सदर धनादेश प्राप्त करुन घ्यावेत म्हणून अपीलकारास कोणीही अधिका-याने,कार्यालयाने कळविलेले नाही असा अपीलकाराने दावा केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने सेवानिवृत्ती लाभाचे धनादेश प्राप्त करुन घ्यावेत म्हणून अपीलकारास पाठविण्यात आलेल्या पत्राच्या प्रती, कागदोपत्री पुरावा इत्यादी माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५७१/०२**

**श्री.जयप्रकाश नरसिंह रावराणे,**
**मु.पो.आचिर्णे, घाणेगडवाडी,**
**ता.वैभववाडी,जि.सिंधूदूर्ग. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा धर्मादाय आयुक्त,**
**धर्मादाय आयुक्त कार्यालय,**
**वरळी, मुंबई-१८.**

**जन माहिती अधिकारी तथा सरचिटणीस,**
**घाणेगडवाडी विकास मंडळ, कांजूरमार्ग(पूर्व),**
**जी.जी.एस कॉलनी रामराज्य, कांजूर व्हीलेज रोड,**
**नेहरुनगर,मुंबई-४२ ..... उत्तरवादी**

## विवेचन

अर्जदार श्री. जयप्रकाश नरसिंह रावराणे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.१०.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती :-

१)घाणेगडवाडी विकास मंडळ नोंदणी पासून मार्च,२००९ पर्यंत मिनीटबूक वरुन(प्रोसिडींग) प्रत्येक सभेच्या वृत्तांताची नक्कल

२) जमाखर्च नोांदवहीवरुन संपूर्ण जमाखर्च तपशीलाची नक्कल

३)बँकेच्या पासबुकाच्या छायांकित पती

४) पदाधिकारी यांची नावे व पूर्ण पत्ता

५) वैभववाडी पोलीस स्टेशन वैभववाडी यांना जयप्रकाश रावराणे यांचेविरुध्द दिलेल्या अर्जाची नक्कल

६) मंडळाचे सभासदांची नावे

मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने प्रथमअपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती १५ दिवसात निःशूल्करित्या पुरवावी असे दि.८.७.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही उत्तरवादीने माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन घाणेगडवाडी विकास मंडळाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली हाती. अपीलकारास माहिती १५ दिवसाचे आत पुरवावी असे प्रथमअपीलीय अधिकारी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांनी दि.८.७.०९ रोजी आदेश पारित केले आहेत. घाणेगडवाडी विकास मंडळ हे खाजगी मंडळ असल्याचे दिसून येते. घाणेगडवाडी विकास संस्था ही जून,२००७ मध्ये स्थापन झाली. ती धर्मादाय आयुक्त बृहन्मुंबई यांच्याकडे संस्था नोंदणी १८६० कायद्याखाली नोंदविली. त्याचाच एक भाग न्यास नोंदणी अधिनियम १९५० खाली अजून नोंदणीसाठी धर्मादाय आयुक्त यांच्याकडे प्रलंबित आहे. त्यामुळे अधिकृत कागदपत्रे जोपर्यंत पूर्णपणे संस्था नोंदणीकृत होत नाही तोपर्यंत माहिती देण्यास हतबल आहे. सदर संस्थेस केंद्र अगर महाराष्ट्र शासनाकडून कुठलीही सरकारी मदत होत नसल्याने संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा कायदा लागू होत नाही असे संस्थेचे कार्याध्यक्ष/सचिवांनी दि.२६.३.२०१० रोजी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. सदर सादर केलेला अहवाल योग्य असून यावरुन सदर संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याने मी या परिस्थितीत खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५७३/०२**

**श्री. संतोष भिकू कुरणकर,**
**द्वारा- दिलीप शंकर श्रीवर्धनकर,**
**५६/आय, रुम नं.१०, रसूल जीवा कंपाऊंड,**
**के.के. मार्ग, सात रस्ता, मुंबई-४०००११ ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा निवासी नायक तहसिलदार,**
**तहसिलदार कार्यालय, श्रीवर्धन, ता.श्रीवर्धन,**
**जि.रायगड-४०२११०. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. संतोष भिकू कुरणकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.९.११.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.७.०९अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)बोटखत अभिलेखाची आपणाकडून कोणती व कशाप्रकारे विल्हेवाट लावण्यात आली आहे याबाबतची कागदपत्रे देण्यात यावी.

२)बोटखत अभिलेखाची विल्हेवाट आपल्या कार्यालयात कोणत्या साली व कोणाकडून लावण्यात आली त्याबाबतची कागदपत्रे पुरविण्यात यावीत

३) श्रीवर्धन तालुक्यातील मौजे बोर्ली-पंचतन हद्दीतील आपल्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या कोणत्याही मिळकतीच्या बोटखताची प्रत देण्यात यावी

४)तहसील कार्यालयातील प्रशासन लिपिक व माहिती अधिकारी यांनी शोध घेऊनही बोटखत सापडत नसेल तर अशा अभिलेखाची उणीव भरुन काढली असल्यास त्या अभिलेखाच्या प्रती पुरविण्यात याव्यात.

जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१७.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी राज्य माहिती आयुक्त, कोकण यांनी दि.२१.४.०९ रोजी आदेश पारित केले असल्याचीबाब जन माहिती अधिका-यांनी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. या प्रकरणी राज्य माहिती आयुक्त, कोकण यांनी पूर्वीच निर्णय दिला असल्याने सदर प्रकरण बंद करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील प्रकरण बंद करण्यात येत आहे.**

मुंबई<br>दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**<br>**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५६६/०२**

**श्री. दिनेश टी. गांधी,**
**२७/बी, लॉयर्स चेंबर्स,**
**पिकेट रोड, मुंबई-४००००२. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता(बी.पी.),शहरे,**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई,**
**ई वार्ड ऑफीस,३ रा मजला, १०,शेख हफीजुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(बी.पी.),शहरे-III,**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई,**
**ई वार्ड ऑफीस,३ रा मजला, १०,शेख हफीजुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई-४००००८. ..... उत्तरवादी**

## विवेचन

अर्जदार श्री. दिनेश गांधी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.६.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन लॉयर्स चेंबर्स प्रीमायसेस सहकारी गृहनिर्माण संस्था लि.,पीकेट रोड, काळबादेवी मुंबई या संस्थेच्या कंपाऊंड भिंत आणि पोलीस निवासस्थानच्या कंपाऊंड भित यामधील जागेत शेड बनविण्यात आली आहे त्याच्या मालकी हक्काबाबत सविस्तर माहिती,शेड बांधकामाच्या नकाशाची प्रत, पूर्णत्वाच्या दाखल्याची प्रत इत्यादि अनुषंगिक माहिती राज्य माहिती आयोगातील जन माहिती अधिका-यांकडे मागीतली होती. माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता कार्यालयात हजर राहून संबंधीत फाईलचे निरिक्षण करावे. त्यानंतर निवडक कागदपत्रांच्या छायाप्रती विहित शुल्क भरल्यानंतर पुरविण्यात येतील असे बृहन्मुंबई महानगरपालिकेतील जन माहिती अधिका-यांनी दि.२१.२.०९च्या अर्जा संदर्भात अपीलकारास कळविले होते, असे अपीलातील कागदपत्रांवरुन दिसते. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथ्म अपील न करता अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले.

संबंधीत फाईलचे निरिक्षण केल्यावर मागणीप्रमाणे आवश्यक माहिती देण्याची कार्यालयाने तयारी दशविली होती असे अपीलातील कागदपत्रांवरुन दिसते. परंतू अपीलकार फाईलचे निरिक्षण करण्याकरीता कार्यालयात हजर झाले होते किंवा कसे याचा बोध होत नाही. कारण द्वितीय अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार हजर नव्हते.

अपीलकाराने सदर प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीचा अवलंब केलेला नाही. म्हणून सदर प्रकरण बंद करण्यात येत आहे.

**आदेश**

**सदर प्रकरण बंद करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४३३/०२**

**श्री. चंद्रभान देवराम कांबळे,**
**संताई सदन, नवजीवन रहिवाशी संघ,**
**स.गो.बर्वे मार्ग, कर्ला(पूर्व),**
**मुंबई-४०००२४.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभाग,**
**१ला मजला, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत,**
**स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला(प.),**
**मुंबई-४०००७०**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभाग,**
**१ला मजला, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत,**
**स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला(प.),**
**मुंबई-४०००७०** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. चंद्रभान देवराम कांबळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.१.१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३.६.०९ रोजी अर्ज करुन मानव टी सेंटर-आरोग्य विभाग(हेल्थ) यांना देण्यात आलेला परवाना व परवाना देण्यासाठी सादर केलेल्या पुराव्यासाठी सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित नक्कला मिळणेसाठी मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१७.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन ला.नं.७६१४४३९२२ मानव टी सेंटरला आरोग्य विभागाकडून लायसन्स देण्यात आले त्यासंबंधी जे पुरावे देण्यात आले त्या सर्व संबंधीत कागदपत्रांच्या छायाप्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, मानव टी सेंटरला लायसन्स देण्याकरीता मानव टी सेंटरच्या मालकाकडून पुराव्यादाखल कोणकोणती कागदपत्र घेण्यात आली व ज्या आधारे लायसन्स देण्यात आले त्यासंबंधीच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत जन माहिती अधिका-यांनी पुरवाव्यात.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/३५२५/०२**

**श्री. विजय गुलाबराव बेंडे,**
**४३,मेट्रो हाऊस,३री मरीन स्ट्रीट,**
**४था मजला, धोबीतलाव,**
**मुंबई-४००००२. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**८५/९५ रजनी महल, ताडदेव,**
**मुंबई-४०००३४.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सी/३/४ विभाग,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**चंदनवाडी, मुंबई-४००००२. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. विजय ग ुलाबराव बेंडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.८.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.३.०९ अर्ज करुन दि.११.७.२००८ आणि दि.७.१.२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवर केलल्या कारवाईची सविस्तर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१३.५.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२६.५.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अवैधरित्या करण्यात आलेल्या बांधकामाविरुध्द कारवाई करण्याबाबत दि.११.७.०८ व दि.७.१.२००९ रोजी जन माहिती अधिका-याकडे तक्रार केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती अपीलकाराने मागीतली होती. अपीलकाराच्या तक्रारीनुसार अपीलकाराच्या इमारतीस उपमुख्य अभियंता(द.), कार्यकारी अभियंता, उप अभियंता यांनी समक्ष भेट दिली असता संबंधीत ठेकेदासरास दुरुस्तीमध्ये सुधारणा करण्यास सांगीतले. त्यावेळी अपीलकारही हजर होते. अपीलकारासमक्ष कामात सुधारणा करण्याबाबत ठेकेदारास सांगितले आहे. त्यानुसार संबंधीत ठेकेदाराने काम पूर्ण करुन कार्यालयास कळविले असल्याची बाब जन माहिती अधिका-यांनी दि.१३.५.०९च्या पत्रान्वये अपीलकारास कळविलेली आहे. तक्रारीबाबत जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या खुलाशाने अपीलकारास हवी असलेली माहिती समाधानकारकपूर्वक प्राप्त झाली. इमारतीबाबत अपीलकाराचा झालेला गैरसमज पूर्णपणे दूर झाला असे अपीलकाराने जन माहिती अधिका-यांना लेखी पत्र दिले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगास सादर केले व तसे प्रतिपादन केले. सदर प्रकरणी ठेकेदारास कामाच्या रकमेचा हप्ता दिला किंवा कसे याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५६७/०२**

**श्री. दिनेश टी. गांधी,**
**२७/बी, लॉयर्स चेंबर्स,**
**पिकेट रोड, मुंबई-४००००२. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपायुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**मुंबई-४०० ००१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. दिनेश टी.गांधी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.६.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३.२.०९ रोजी अर्ज करुन लॉयर्स प्रीमायसेस सहकारी गृहनिर्माण संस्था लि., काळबादेवी, मुंबई या संस्थेच्या इमारतीच्या तळ मजल्यावर दुकान क्र.८ व ९ येथे हॉटेल रामदास भूवन मालकास बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेले लायसन्स, किती चौ.फूट जागा वाटप केली, परवाना क्रमांक, वैधता कालावधी, इमारतीच्या परिसरात गॅस सिलेंडर स्टोअर करण्यास परवाना दिला आहे का, संस्थेने याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेस ना-हरकत प्रमाणपत्र दिले असल्यास त्याची प्रत इत्यादी अनुषंगिक ४ मुद्यांवर माहिती मागीतली होती. अपीलकाराने माहितीच्या अधिकारातील अर्ज संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिका-याकडे सादर करुन माहिती मागण्याऐवजी राज्य माहिती आयोगाकडे अर्ज केला आहे. तसेच प्रथम अपीलही राज्य माहिती आयोगाकडे केले आहे. यावरुन अपीलकाराने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीचा अवलंब केलेला नाही. सुनावणीकरीताही अपीलकार हजर नव्हते. यामुळे सदर प्रकरण बंद करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**सदर प्रकरण बंद करण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांक २६.३.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४३५/०२**

**श्री. इश्ताक महम्मद इब्राहिम बागबान,**
**सिताराम बिल्डिंग, जी ब्लॉक,**
**रुम नं.१४/१५, ३ रा मजला,**
**एम.आर.ए. मार्ग, क्रॉफर्ड मार्केट,**
**मुंबई-४००००१. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता,**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई,**
**इ वार्ड ऑफीस इमारत, १० शेख हाफीजुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(बी.प्र.)शहरे-२,**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई,**
**इ वार्ड ऑफीस इमारत, १० शेख हाफीजुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई-४००००८. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. इश्ताक मोहम्मद इब्राहिम बागबान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.१०.२००९ अर्ज करुन बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९९१ अनुसार ब्लू बेल अपार्टमेंटच्या गाळे धारकांना किती कार पार्कींग स्लॉट्स पुरविण्यात आले आहेत, ब्लू बेल अपार्टमेंटच्या ७ मजली इमारतीचा विस्तार करुन आणखी ३ मजले वाढविण्यात आले, त्यानंतर कार पार्कींग करीता अधिकची किती जागा करण्यात आली इत्यादी एकूण ४ मुद्यांबाबतची अनुषंगिक माहिती मागीतली होती. कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत फाईलचे निरिक्षण करावे. संबंधीत फाईल कार्यालयात उपलब्ध आहे. त्यानंतर विहित शुल्क आकारुन उपलब्ध माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२३.११.०९ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांच्या म्हणण्यानुसार संबंधीत कागदपत्रांचे निरिक्षण करावयाचे नाही. मागणीप्रमाणे माहिती हवी

असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.३०.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.१६.१२.०९ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपील निकालात काढले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन कार पार्कींग स्लॉट्सबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकारास माहिती देणे साईचे व्हावे म्हणून जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पत्रपाठवून प्रथम संबंधीत कागपत्रांचे निरिक्षण करावे असे कळविले आहे. अपीलकार संबंधीत कागदपत्रांचे निरिक्षण करण्यास इच्छुक नाहीत, त्यांना मागणीप्रमाणे माहिती हवी आहे. उत्तरवादीने माहितीच्या प्रमाणित छायाप्रती देण्याकरिता बेसुमार शुल्क आकारणी केल्याचा द्वितीय अपीलात मुद्दा उपस्थित केला आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ मधील नियम ४(१)(अ)(क) अनुसार माहिती बद्दलची फी निश्चित करण्यात आली आहे. यानुसार संबंधीत विभागाने विशिष्ट दस्तऐवज, नकाशे इत्यादींची किंमत अगोदरच निश्चित केली असेल तर त्याबाबतची अशी निश्चित केलेली किंमत अधिक टपाल खर्च अपीलकाराने संबंधित सार्वजनिक प्राधिकरणास देणे आवश्यक असल्याची सदर नियमात तरतूद आहे. अन्यथा छायांकित केलेल्या प्रत्येक पृष्ठासाठी (ए-४ किंवा ए-३ आकारातील कागद) २ रु. अधिक टपाल खर्च इतके शुल्क अपीलकाराने सार्वजनिक प्राधिकरणास माहितीपोटी अदा करणे आवश्यक असल्याची नियमात तरतूद आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने विशिष्ट दस्तऐवज,नकाशे इत्यादीसाठी किंमत अगोदरच निश्चित केली असल्याचे समजते. सदर प्रकरणी माहितीच्या प्रमाणित प्रती देण्याकरिता उत्तरवादीने बेसुमार शुल्क आकारणी केली आहे असे म्हणता येणार नाही. कार्यालयाने निश्चित केल्यानुसार उत्तरवादीने शुल्क आकारणी करणे आवश्यक आहे. अपीलकाराने माहितीपोटी नियमानुसार कार्यालयात शुल्क भरणा करावा. माहितीपोटी शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांक २६.३.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४०३/०२**

**श्री. रविंद्र मधुकर सावंत,**
**रुम नं.४/४४ डी, परमानंद कुंभार बिल्डिंग,**
**एलफीस्टन रोड, मुंबई-४०००१३. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त परिमंडळ १२,**
**शैलेंद्र नगर, दहिसर(पूर्व),**
**मुंबई-४०००६८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**उत्तर नियंत्रण कक्ष,**
**मुंबई ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. रविंद्र एम.सावंत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.८.०९ रोजी अर्ज करुन दि.१६.५.०८, दि.२१.४.०९ व दि.२७.४.०९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.९.०९ च्या पत्रानुसार माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ बाबत अर्जदारास माहिती पुरविण्यात यावी असे दि.३.११.०९ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेचअपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. अर्जदार श्रीमती सोनिया उधवानी व श्रीमती अमिता कापडीया व नितीन कापडीया यांचेमध्ये फ्लॅट विक्रीचा करार झाला होता. विरोधक श्रीमती अमिता कापडीया व नितीन कापडीया यांनी फ्लॅट विक्री करुन ताबा न दिल्याबाबत एकूण १,८३,६१५/- रकमेचा विश्वासघात करुन फसवणूक केल्याबाबत अर्जदाराने दिलेल्या तक्रार अर्जावरुन दिनांक २०.१२.२००७ रोजी श्रीमती अमिता कापडीया व नितीन कापडीया यांचेविरुध्द बोरीवली पोलीस ठाणे येथे गु,नों.क्र.४४११०७ कलम ४२०,४०६,३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाच्या तपासामध्ये अर्जदार व गैरअर्जदार यांचेत फ्लॅटचे पैसे देणे घेणे यावरुन सन २००४ पासून वाद असल्याचे निष्पन्न झाले. अर्जदाराने सन २००४ ते २००७ या कालावधीत कोठेही तक्रार केलेली नव्हती. गुन्हयाच्या तपासाअंती विरोधकांनी अर्जदाराची कोणतीही फसवणुक अथवा अन्यायाने विश्वासघात केला नसल्याचे निष्पन्न झाले. एकंदरीत तपासावरुन सदरचा गुन्हा हा दिवाणी स्वरुपाचा असल्याचे निष्पन्न झाल्याने “दिवाणी वर्गीकरण समरी” मंजुरीकरीता अहवाल न्यायालयात सादर करण्यात आला आहे. सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

सदर गुन्हयाच्या तपासाबाबत अर्जदारास वेळोवेळी माहिती देण्यात आली आहे. वेळोवेळी माहिती देऊनही अर्जदाराचे समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक २३.४.०९ रोजी बोरीवली पोलीस ठाणे समोर दिवसाचे उपोषण सुरु केले. सदर ठिकाणी प्रवेशद्वारासमोर, मुख्य रस्त्यावर लोकांची गर्दी होवून वाहतुकीस अडथळा व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निमाण होऊ लागल्याने अर्जदार व त्यांच्या मुलास पोलीस ठाणेत बोलावून असे न करण्याबाबत व कायदेशीर मार्ग अवलंबिण्याबाबत समज देऊन जाऊ देण्यात आले. त्यांच्याशी व त्यांच्या मुलाशी कुठल्याही प्रकारे उध्दट वर्तन अथवा मारहाण करण्यात आलेली नाही. तरी देखील अर्जदाराने उपोषण चालू ठेवल्याने दि.२९.४.२००९ रोजी त्यांना कलम १४९ फौ.द.प्र.सं.प्रमाणे नोटीस देण्यात आली. त्यानंतर त्यांनी उपोषण मागे घेतले आहे.

सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी दि.१६.११.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४३१/०२**

**श्री. संजय शरद सिरसीकर,**
**कक्ष अधिकारी,**
**वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**वित्त विभाग,प्रशा-२,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. संजय शरद सिरसीकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.१०.०९ रोजी अर्ज करुन सन १९८१ ते सन २००९ या कालावधीतील अपीलकाराच्या गोपनीय अहवालाच्या प्रतीची मागणी केली होती. अपीलकाराची गोपनीय अहवाल धारिका सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात आली आहे.सदर धारिका विभागास प्राप्त झाल्यानंतर मागणी केलेल्या माहितीबाबत विचार करण्यात येईल असे जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव श्री.व.कृ.पाटील यांनी अपीलकारास दि.१२.११.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप सचिव श्रीम.नसीमा शेख यांचेकडे दि.३.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.११.१२.०९ रोजी प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन गोपनीय अहवालाच्या छायाप्रतींची मागणी केली होती. अपीलकाराची गोपनीय अहवालाची धारिका सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात आली होती. सामान्य प्रशासन विभागाकडून गोपनीय अहवालाची धारिका प्राप्त झाल्यानंतर अपीलकाराच्या सन १९९० पासूनच्या

गोपनीय अहवालांच्या प्रती एकूण ८३ पृष्ठे त्यांना पुरविण्यात आल्या असल्याचा प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२२.३.२०१० रोजी लेखी अहवाल आयोगास सादर केला आहे. यावरुन सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४०१/०२**

**श्री. सईदूररहमान,**
**१८२,धाबू स्ट्रीट,**
**सैफी मस्जिद जवळ,**
**नलबाजार, मुंबई-३. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा शिक्षण निरीक्षक,**
**बृहन्मुंबई महानगरपालीका,**
**बृहन्मुंबई, उत्तर विभाग,**
**चेंबूर, मुंबई-७१.**

**जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उप निरीक्षक(एल वार्ड),**
**बृहन्मुंबई महानगरपालीका,**
**बृहन्मुंबई, उत्तर विभाग,**
**चेंबूर, मुंबई-७१ ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. सईदुर्रहमान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.१०.०९ रोजी अर्ज करुन दि.५.५.०९ रोजी दाखल केलल्या तक्रारीवरील केलेल्या कारवाईची माहिती, टिप्पणी, अभिप्राय, आदेशाची प्रत,अंजूमन-इ-इस्लाम कुर्ला बॉईज हायस्कूलच्या मुख्याध्यापिका अंजूम सबीहा बेग यांच्याकडून अधिकाराचा गैरवापर करुन अनियमितता केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१७.११.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२३.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते/जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अंजूमन-इ-इस्लाम कुर्ला बॉईज हायस्कूलच्या मुख्याध्यापिका अंजूम सबीहा बेग यांच्या अनियमिततेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी पुरविलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर प्रथम अपील दाखल करण्याची अधिनियमात तरतूद आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे दि.२३.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. परंतु प्रथम अपीलीय अधिका-यांनी सदर प्रकरणी सुनावणी आयोजित केली नाही. प्रथम अपीलीय अधिका-याची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपीलीय अधिका-यांनी सदर प्रकरणी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित करावी. आवश्यक ते आदेश पारित करावेत. सदर आदेशाने समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहील.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई<br>
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**<br>
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३९०/०२**

**श्री. रविंद्र मधुकर सावंत,**
**रुम नं.४/४४डी,परमानंद कुंभार बिल्डिंग,**
**एलफीस्टन रोड, मुंबई-४०००१३. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(३),**
**गृहनिर्माण भवन, कक्ष क्र.६९,**
**तळ मजला, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,आर विभाग,**
**३१६, अे-१ बिल्डिंग, वडाळा ट्रक टर्मिनल,**
**वडाळा(पूर्व), मुंबई-४०००३७. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. रविंद्र सावंत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१२.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.८.०९ रोजी अर्ज करुन श्री.बळवंत सहकारी गृहनिर्माण संस्था लि. बोरीवली(प.) या संस्थेची सदनिका क्र.१५५ सी विंग या सदनिकेच्या हस्तांतरणाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदरची माहिती संस्था स्तरावरची आहे. माहितीच्या अधिकाराअंतर्गत कार्यालयातील कागदपत्रांची माहिती पुरविणे अपेक्षित आहे असे जन माहिती अधिका-यांनी दि.२२.९.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन दि.२५.११.०९रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने आयोगाकडे अपील केले.

सदर अपीलावर दि.१८.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीताअपीलकार उपस्थित होते/जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी

अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सदनिकेच्या हस्तांतरणाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती संस्था पातळीवरील आहे. माहितीच्या अधिकारानुसार कार्यालयातील माहिती पुरविणे अपेक्षित आहे असे उत्तरवादीने अपीलकारास कळविलले आहे. यावरुन सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपीलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३९२/०२**

**श्री. सईदूर्ररहमान,**
**१८२,धाबू स्ट्रीट,**
**सैफी मस्जिद जवळ,**
**नलबाजार, मुंबई-३.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा शिक्षण निरीक्षक,**
**एल वार्ड, ॲडमिनिस्ट्रेटीव्ह बिल्डिंग,२रा मजला,**
**चेंबूरकर मार्ग,चेंबूर, मुंबई-७१.**

**जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उप निरीक्षक(नॉर्थ झोन),**
**एल वार्ड, ॲडमिनिस्ट्रेटीव्ह बिल्डिंग,२रा मजला,**
**चेंबूरकर मार्ग,चेंबूर, मुंबई-७१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. सईदूर्ररहमान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.५.०९ रोजी अर्ज करुन अंजूमन-इ-इस्लाम आलाना कुर्ला मुलींचे हायस्कूल मध्ये शिक्षण विभागाच्या संमतीने झालेल्या अनियमिततेबाबत केलेल्या तक्रार अर्जावरील कारवाईची माहिती,टिप्पणी,अभिप्राय,आदेश, अहवाल इत्यादी कागदपत्रांची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२४.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.३.३०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी

अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

अंजूमन-इ-इस्लाम आलाना कुर्ला मुलींचे हायस्कूल मधील अनियमिततेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे मुलींच्या हायस्कूलमधील अनियमिततेबाबत केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३६६/०२**

**श्री. राघवेंद्र पी. यजुर्वेदी,**
**३०२/ए, नव आसावरी को.ऑप.हौ.सो.,**
**१८२,जे.बी. नगर, अंधेरी(पूर्व),**
**मुंबई-४०० ०५९.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सह आयुक्त(विधी),**
**अन्न व औषध प्रशासन आयुक्तांचे कार्यालय,**
**बांद्रा-कुर्ला कॉंप्लेक्स,बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. आर.पी.यजुर्वेदी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.०६.०९ रोजी अर्ज करुन लॅबोरेटरीमधील टेस्टींग मशीनरी आणि उपकरणांची तसेच औषध खरेदी संबंधीच्या फाईलचे निरिक्षण करण्यास परवानगी मागीतली होती. तसेच अनुषंगिक एकूण ६ मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली. फाईलचे निरिक्षण करण्यास परवानगी दिली. अर्जातील मुद्दा क्र.३ व ६ ची जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.१५.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, औषध, मशिनरी, उपकरणे खरेदी संबंधीची फाईल निरिक्षण करण्यास व एकूण ६ मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास सर्व माहिती पुरविली. फक्त सी.आर.बाबत माहिती पुरविली नाही. सी.आर.बाबत माहिती पुरविण्याबाबत आयोगाकडून कळविण्यात येत नाही. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई<br>
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**<br>
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३६७/०२**

**श्री. राघवेंद्र पी. यजुर्वेदी,**
**प्रेसीडेंट-सोसायटी फॉर अवेअरनेस ऑफ सिव्हील राईट्स,**
**जे-२२०,अंसा, साकी विहार रोड, साकीनाका,अंधेरी(पूर्व),**
**मुंबई-४०००५९.** **..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता(बी.अँड एफ),**
**ए वार्ड, एम.सी.जी.एम. कार्यालय, १३४-ई, शहीद भगतसिंग मार्ग,**
**मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता(बी.अँड एफ),**
**ए वार्ड, एम.सी.जी.एम. कार्यालय, १३४-ई, शहीद भगतसिंग मार्ग,**
**मुंबई-४००००१.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. आर.पी. यजुर्वेदी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.९.०९ रोजी अर्ज करुन काँग्रेस समितीचे फोर्ट येथील कार्यालयाचे नुतनीकरण आणि अंतर्गत फेरबदलाबाबतच्या शेवटच्या प्रस्तावाच्या छायाप्रती व इतर अनुषंगिक एकूण ५ मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.६.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते,जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी

अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, काँग्रेस कमिटीच्या कार्यालयाच्या नुतनीकरण व अंतर्गत फेरबदलासंबंधीच्या शेवटच्या प्रस्तावाच्या प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३८६/०२**

**श्री. गणेश किशनराव कोपले,**
**४/६६, गितांजली, समता नगर, कांदिवली(पूर्व),**
**मुंबई-४००१०१.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्य व्हिजीलन्स आणि सिक्युरीटी ऑफीसर,**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अन्वेषण अधिकारी,**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. गणेश किशनराव कोपले यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.७.०९ रोजी अर्ज करुन प्रा.केशव खंडाळे आणि आर.डी.पवार यांनी केलेल्या तक्रारीवर चौकशी करण्याबाबत मुख्य दक्षता अधिकारी यांना दि.२३.५.२००० रोजी कळविण्यात आले. त्यानुसार प्रा.खंडाळे आणि पवार यांचे नोंदविलेल्या स्टेटमेंटची प्रत, म्हाडाच्या अधिका-यांविरुध्द प्रा.खंडाळे व पवार यांनी दि.८.२.०९रोजी दाखल केलेल्या तक्रारीची प्रत इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१७.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. मागणी केलेल्या माहिती संदर्भात कार्यालयात उपस्थित रहावे असे माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले.

माहिती दिली नाही. प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने आयोगाकडे द्वितीय अपील केले.

सदर अपीलावर दि.१८.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन प्रा. खंडाळे आणि पवार यांनी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रा.खंडाळे आणि पवार यांनी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून अपीलकारास ३० दिवसांचे आत द्यावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३९४/०२**

**श्री. प्रेमानंद विजय तिवरकर,**
**चिंचबंदर,बी.आय.टी.चाळ नं.५/१/२,**
**डॉ.मैशेरी रोड, डोंगरी,**
**मुंबई-४०० ००९.** **..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अवर सचिव(प्रशासन),**
**राज्यपालांचे सचिव कार्यालय,**
**राजभवन, मलबार हिल,**
**मुंबई-४०००३५.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. प्रेमानंद विजय तिवरकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.१०.०९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)सन २००१ रोजी महाराष्ट्र शासनाने भुसंपादन पक्रियेबाबत नवीन कायदा अंमलात आणला आहे काय?

२)सन २००१ रोजी पासून अंमलात आणलेला कायदा लावणे हे बंधनकारक आहे काय? व नवीन कायदा असतांना जुन्या कायद्याने जमीन संपादन करता येते काय व कसे?

३)आपल्या मते १७ नंबरचे कलम हे केव्हा जाते? तसेच हया कलमाची कालमर्यादा शासनाने ठरविलेली आहे काय? ती किती काळ मर्यादित आहे?

४)उपरोक्त ठिकाणी होणारा प्रस्तावित जैतापूर अणू उर्जासाठी लागणा-या जमिनीचे भूसंपादन कोणत्या कायद्यानुसार करण्यात यत आहे?

५)सदर भूसंपादनासाठी आपल्याकडे कोणता प्रस्ताव पाठविण्यात आला होता काय?

६) प्रस्तावित अणुउर्जेसाठी लावण्यात आलेले १७नंबरचे कलम योग्य आहे काय?

७) सद्यःस्थितीत होणारे धनादेशांचे वाटप हे नियमाला धरुन आहे काय?

८)सदर ठिकाणी होणा-या भूसंपादनाचे मुल्यांकनाची प्रक्रिया झाली आहे काय?झाली असल्यास त्या संदर्भातील तारीख, वार माहिती द्यावी.

९) आपण या राज्याचे राज्यपाल म्हणून जर जिल्हाधिकारी चुकीच्या पध्दतीने व आपल्या पदाचा गैरवापर करुन जर भूसंपादर करीत असलील तर आपली भूमीका काय?

१०)आपण या राज्याचे राज्यपाल म्हणून आमची बाजू मांडण्यासाठी, जिल्हाधिकारी व संबंधीत प्रकल्प अधिकारी यांची बैठक आमच्या गावच्या समितीबरोबर आपल्या दालनात बोलवू शकता काय? व कसे.

अपीलकाराने विचारलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असून कार्यालयाकडे उपलब्ध नाही. सदर माहिती संबंधीत विभागाकडून घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी दि.३.११.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२८.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. कार्यालयात उपलब्ध असलेली माहितीच पुरविणे अभिप्रेत असून जेथे वेगवेगळया माहितीचे संकलन, संशोधन,पृथःकरण करणे आवश्यक आहे अशा स्वरुपातील माहिती पुरविणे अभिप्रेत नाही. या संदर्भात जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराचे सा.प्र.वि.च्या परिपत्रक क्र.केमाअ-२००८/प्र.क्र.९३/०८/सहा(मा.अ.)दि.६.९.०कडे लक्ष वेधले. तसेच सदर परिपत्रकाची प्रत दि.२१.१२.०९च्या पत्रासोबत अपीलकारास परविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून यते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन ता.राजापूर जि.रत्नागिरी येथील प्रस्तावित अणुऊर्जा प्रकल्पाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. सदर माहिती कार्यालयाकडे नाही. सदर माहिती संबंधित विभागाकडून प्राप्त करन घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविलेले आहे. यावरुन सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अर्जावर नियमानुसार समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३६४/०२**

**श्री. प्रकाश गोविंद नवार्थ,**
**२०४,राजबाग,दलुचंद को.ऑप.हौ.सो.**
**२७१,सर भालचंद्र मार्ग, माटुंगा**
**मुंबई-४०००१९. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप प्रमुख अभियंता(ह.प्र.)शहर,**
**महानगरपालिका ई विभाग,**
**भायखळा, मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(ह.प्र.)शहर,**
**महानगरपालिका ई विभाग,**
**भायखळा, मुंबई-४००००८. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. प्रकाश नवाथे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.१०.०९ रोजी अर्ज करुन विकास नियंत्रण नियमावली १९९१ जैन आणि भट-सॉलीसीटर आणि ॲडव्होकेट या पुस्तकातील पान क्र.१६७ वरील रेग्युलेशन ६(७)बाबत आपण सहमत आहात किंवा कसे याबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराने विचारलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मधील माहितीच्या व्याख्येत बसत नाही. तथापि, अपीलकाराच्या माहितीशी निगडीत धारिणी कार्यालयात उपलब्ध आहे. त्याकरीता कार्यालयीन कामकाजाचे दिवशी पूर्व सूचना देऊन दुपारी ३ ते ५ या वेळेत संबंधीत धारिणीचे अवलोकन करावे. हवे असलेले आराखडे व इतर कागदपत्राच्या छायाप्रती शुल्क भरुन उपलब्ध करुन देण्यात येतील असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.५.११.०९ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१७.११.०९ रोजी प्रथम

अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.२५.११.०९ रोजी आदेश पारित केले.

सदर अपीलावर दि.१८.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी पारित केलेले आदेश समाधानकारक नाही, सदर आदेशात बृहन्मुंबई महानगरपालिकेची कार्यपध्दती(Procedure) सांगण्यात आली आहे. सदर आदेश दिशाभूल करणारा असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलात मुद्दा उपस्थित केला आहे. इमारत पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यावर आर्कीटेक्ट डेव्हलपमेंट कंप्लीशन सर्टीफिकेटसाठी अर्ज सादर करतो आणि मूळ आराखडयात बदल केलेला नसल्यास आयुक्तांकडून भोगवटा प्रमाणपत्र(Occupancy Certificate) दिले जाते. म्हणजे Occupation Certificate हेच अंतीम प्रमाणपत्र आहे या गोष्टीशी उत्तरवादी सहमत आहे किंवा कसे याची माहिती अपीलकाराने मागीतलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च)मधील माहितीच्या व्याख्येत अपीलकाराची मागणी बसत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले आहे. यावरुन उत्तरवादीने अर्जावर अपीलकारास नियमानुसार समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपीलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/३४०१/०२**

**श्री. वैभव सदानंद पालकर,**
**५४/१३४५, कन्नमवार नगर नं.२,**
**विक्रोळी(पूर्व),**
**मुंबई-४०००८३.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एस विभाग,**
**भांडूप(प.), मुंबई-४०००१८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एस विभाग,**
**भांडूप(प.), मुंबई-४०००१८.** ..... **उत्तरवादी**

## विवेचन

अर्जदार श्री. वैभव सदानंद पालकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.७.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.४.०८ रोजी अर्ज करुन जनता मार्केट कन्नमवार नगर-२ येथील शेड लगतचे उत्तरेकडील (श्री.गणेश मैदान फेन्सींग जवळचे) गटार व शेड याबाबत खालील माहिती मागीतली होती.

१)तक्रार दर्शविलेल्या गटाराची बांधणी ज्या वर्षी करण्यात आी त्याचा तपशील देण्यात यावा

२)बांधण्यात आलेल्या गटाराची जागा मुंबई महानगरपालिकेची असल्यास त्यांनी म्हाडाकडून/कलेक्टरकडून ज्या दिवशी स्वतःकडे ती जागा घेतली त्याचा दिनांक व साईज देण्यात यावी

३)नकाशात दर्शविलेल्या रोडलगत मुंबई महानगरपालिकेने यापूर्वी फूटपाथ बांधलेला होता अथवा नाही याबाबतची माहिती व तो ज्या दिवशी बांधला होता त्याचा दिनांक व साईज देण्यात यावी

४)नकाशात दर्शविलेला रोड व त्यालगतची जागा यापैकी मुंबई महानगरपालिकेच्या मालकीची जेवढी जागा आहे त्याची साईज देण्यात यावी. उदा.मुंबई महानगरपालिकेच्या शेडची साईज व त्या लगत असलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या मोकळया जागेची साईज देण्यात यावी.

५) श्री गणेश मैदानाची फेन्सींग व इतर यामधील जागा मुंबई महानगरपालिकेच्या मालकीची नसल्यास ती कोणाच्या मालकीची आहे याचा तपशील देण्यात यावा.

६) वर नमूद करण्यात आलेला रोड, त्या लगतचे गटार आणि मोकळी जागा दर्शविणा-या नकाशाची(ले आऊट प्लॅनची) प्रत देण्यात यावी. त्यावर रोड व इतर मोकळी जागा यांची अंतर व साईज दर्शविलेली असावी.

सदर माहिती विभागात उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण) एस विभाग यांनी अपीलकारास दि.२२.५.०८च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने दि.२१.६.०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास दि.२८.७.०८ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे निर्णय कळविला.

१)आपला दि.२३.६.०८ चा अपिल अर्ज मी अभ्यासला आहे

२)आपण जोडलेले दि.२२.४.०८ चे प्रथम माहितीचा अर्ज मी पाहिलेला आहे

३)तसेच सार्वजनिक माहिती अधिकारी म्हणून सहाय्यक अभियंता(परिरक्षण) यांचे पत्र क्र.सआएस/२४०५/सअप दि.२१.५.०८ चे उत्तर मी अभ्यासिले आहे.

४)आपण आपल्या अपील अर्जात दाद मागण्याची कारणे मी वाचले आहे. आपण Cause of grievance about lack of information याबाबत दाद मागत आहात. सदर बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा कलम २(च) अन्वये माहिती या व्याख्येत मोडत नाही

५)परंतू आपण दाद मागण्याची कारणे यात आपले जे म्हणणे आहे ते या सुचना समजून मी संबंधितांना तशी माहिती प्राप्त करुन देण्यास सांगितले आहे. सध्या पावसाळा असून परिरक्षण खात्यातील अभियंते हे पावसाळी व आपत्कालीन कामात व्यस्त आहेत. म्हणून सदर माहिती प्राप्त करण्यास विलंब लागेल याची नोंद घ्यावी.

अपीलकारास माहिती उपलब्ध करुन देणेबाबत संबंधीतांना सांगितले आहे असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२०.७.०८च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले होते. परंत त्यानंतरही माहिती मिळाली नाही यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जनता मार्केट कन्नमवार नगर-२ येथील रोड व त्यालगतचे गटार याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्याबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी सूचना दिल्या त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३८८/०२**

**श्री. ईश्वरभाई डी. हंकारे,**
**आर.बी.के.यू.,न्यु इंडीया सेंटर,८वा मजला,**
**इन्स्टिटयूट ऑफ सायन्सच्या समोर,**
**कुपरेज ग्राऊंडच्या जवळ,**
**मुंबई-४००१०१.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा डेप्युटी रजिस्ट्रार,**
**को.ऑप.सेल, म्हाडा गृह निर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा को-ऑपरेटीव्ह ऑफीसर,**
**को.ऑप.सेल, म्हाडा गृह निर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. ईश्वरभाई डी.हंकारे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.४.८.०९ रोजी अर्ज करुन म्हाडा सहकारी गृह निर्माण संस्थेवर खाजगी व्यक्तीची प्रशासक म्हणून नेमणूक केली, सदर व्यक्ती म्हाडाचे कर्मचारी नाही अथवा सदर संस्थेचे रहिवाशी नाहीत याबाबत एकूण ८ मुद्यांवर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास आवश्यक ती माहिती विहित कालावधीत दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.३०.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित नव्हते.सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन म्हाडा सहकारी गृहनिर्माण संस्थेवर खाजगी व्यक्तीची प्रशासक म्हणून नेमणूक केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली या मुद्यावरुन सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती देण्याचे नाकारले. म्हाडाने जी कार्यवाही केली असेल त्याबाबत माहितीच्या अधिकारात माहिती देणे केव्हाही उचित राहील. अशी माहिती न देण्यासाठी वेगवेगळया कलमांचा आधार घेणे योग्य होत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी हे आदेश प्राप्त झाल्यापासून कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास ३० दिवसाचे आत निःशुल्करित्या पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४२५अे/०२**

**श्री. हरी ओम मुरलीधर,**
**११अे,१०३ स्प्रींग लीफ,**
**लोखंडवाला, कांदीवली(पूर्व),**
**मुंबई-४००१०१.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था(३), मुंबई,**
**गृहनिर्माण भवल, कक्ष क्र,६९,**
**तळमजला, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, आर विभाग,**
**मुंबई.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. हरी ओम मुरलीधर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.९.०९ रोजी अर्ज करुन स्प्रिंग लिफ को.ऑप.हौ.सोसायटी लि., लोखंडवाला, कांदीवली(पूर्व), मुंबई या संस्थेबाबत अनुषंगिक ५ मुद्यांबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराने अर्जात उपस्थित केलेले क्र.१ ते ४ मुद्दे हे प्रश्नार्थक स्वरुपाचे आहेत. माहितीच्या अधिकारामध्ये कार्यालयातील कागदपत्राच्या प्रती मिळणेविषयी मागणी करणे अभिप्रेत आहे. अपीलकाराने कागदपत्रांची मागणी केलेली नाही. अपीलकाराने धारण केलेल्या भागांचे भाग प्रमाणपत्र देणेबाबत संस्थेस सुचित करण्यात येत आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.१०.०९च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले.

अर्जात कोणत्याही कागदपत्राची मागणी केलेली नाही. अर्जदारानी अर्जात प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली आहे. उपनिबंधक सहकारी संस्था आर विभाग यांनी दिलेले उत्तर बरोबर आहे. उपनिबंधक,सहकारी संस्था आर विभाग यांनी अर्जदाराचे भाग प्रमाणपत्राबाबत संस्थेस सूचना दिलेल्या आहेत असे दि.३०.११.०९ रोजी प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. स्प्रींग लिफ सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झाली परंतू संस्था स्थापन होण्यापूर्वीची परिरक्षणाची रक्कम वसूल करता येते का? कोणत्या नियमानुसार त्याच्या प्रती द्याव्यात, संस्थेचे सभासद परिरक्षणाची देय रक्कम नियमितपणे अदा करतात असे असतांना सभासदांना थकबाकीदार म्हणता येईल का, संस्था सभासदांचा छळ करीत आहे म्हणून संस्थेच्या विरुध्द पोलीसात तक्रार करता येईल का, संस्था पीण्याच्या पाण्याची नळ जोडणी व इतर मूलभूत सुखसोई बंद करु शकते का? इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. अर्जदाराने अर्जात प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली असल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती नाकारली आहे. संस्थेने जी कार्यवाही केली असेल त्याबाबत माहितीच्या अधिकारात माहिती देणे केव्हाही उचित राहील. अशी माहिती न देण्यासाठी अधिनियमातील वेगवेगळया कलमांचा आधार घेणे योग्य होत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई — **(रामानंद तिवारी)**
दिनांक २६.३.२०१० — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६५०/०२,**

**श्री.संजय भालचंद्र मेस्त्री,**
**४,तळमजला, मानस,**
**दत्ताराम लाड मार्ग,काळा चौकी,**
**मुंबई- ४०० ०३३.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपमुख्य अधिकारी(पुगा),**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.संजय भालचंद्र मेस्त्री यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.११.०९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१८.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२२.११.०६ रोजी अर्ज करुन २-मानस दत्ताराम लाड मार्ग, काळा चौकी, मुंबई येथील सदनिका अवैधरित्या मंडळ अधिका-यांच्या मदतीने हस्तांतरित केल्या. याबाबत दक्षता पथकाने चौकशी केलेल्या अहवालाच्या प्रतीची व इतर मुद्याबाबत माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.२००८/४१९/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी चौकशी पूर्ण झाली नसल्यास चौकशी पूर्ण झाल्याबरोबर आवश्यक ती माहिती गैरतक्रारदारास उपलब्ध करुन द्यावी असे दि.३.७.०८ रोजी आयोगाने आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्यानेराज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने असे प्रतिपादन केले की, सदर प्रकरणी दक्षतापथकाकडून अहवाल प्राप्त झाला नाही. त्यामुळे तक्रारदारास माहिती पुरविता आली नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २५.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६३७/०२,**

**श्री.अशोक बाबू कांबळे,**
**बुध्दमंदीर रहिवासी संघ चाळ,**
**सेंट फ्रान्सीस रोड, विलेपार्ले(प.),**
**मुंबई-४०००५६.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कॉलनी ऑफीसर,**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन के(प.),**
**अंधेरी(प.), मुंबई-४०००५८.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.अशोक बाबू कांबळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१७.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरीता तक्रारदार हजर होते,गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२.२.०९ रोजी अर्ज करुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गत बौध्दनगर रहिवाशी संघ चाळ, सेंट फ्रान्सीस रोड, विलेपार्ले(प.) मुंबई येथे पुनर्वसन योजना राबविण्यात येतांना परिशिष्ट II मध्ये समावेश करण्याकरीता झोपडपट्टीधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने आयोगाकडे क्र.३३९५/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. तक्रारदारास ३० दिवसाचे आत गैरतक्रारदारांनी माहिती पुरवावी असे आयोगाने दि.३१.१०.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराने मागणी केलेली माहिती तक्रारदारास उपलब्ध करुन देणेबाबत आयोगाने दि.३१.१०.०९ रोजी आदेश देऊनही गैरतक्रारदाराने आयोगाच्या आदेशाचे पालन केले नाही. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग झालेला आहे. याकरीता गैरतक्रारदार यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा. या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६३८/०२,**

**श्री. प्रकाश सखाराम माने,**
**तबेला क्षेत्र सहा, वर्ग-ब,**
**प्रतिविष व रक्तजल विभाग,**
**हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळ(मर्या.),**
**पिंपरी, पुणे-४११०१८** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा**
**व्यवस्थापकीय संचालक,**
**हाफकीन जीव-औषध निर्माण महामंडळ,**
**परळ, मुंबई-१२.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.प्रकाश सखाराम माने यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१८.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरीता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१२.११.०८ रोजी अर्ज करुन श्री.आ.आ.कांबळे व श्री.एम.संजात्रा यांनी तबेला क्षेत्र सहा.वर्ग-क ची पदोन्नती नाकारल्यानंतर त्या ठिकाणी कार्यालयीन आदेश क्र.७३/२००६ नुसार जेष्ठतेनुसार कोणत्या कामगारांना पदोन्नती देण्यात आली, पदोन्नती देण्यात आली नसल्यास त्याची कारणे इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने पुरविलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.३८८८/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. गैरतक्रारदारास अद्यावत माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरवावी असे दि.१४.१२.२००९ रोजी आयोगाने आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने आयोगाकडे तक्रार दाखल केली.

राज्य माहिती आयोगाचे दि.१४.१२.०९ चे आदेश गैरतक्रारदारास विलंबाने प्राप्त झाले. यामुळे तक्रारदारास माहिती देण्यास विलंब झाला असल्याचे गैरतक्रारदारांनी आयोगासमोर तक्रारीवरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. तक्रारदारास, गैरतक्रारदाराने दि.२९.१.०९ रोजी मुद्देनिहाय माहिती पुरविली असल्याबाबत सदर पत्राची प्रत आयोगास सादर करुन गैरतक्रारदाराने सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. सदर प्रकरणी आयोगाचे आदेश मिळण्यास उशीर झाला असल्याने तक्रारदारास माहिती मिळण्यास विलंब झाला. यावरुन तक्रारदारास विलंबाने माहिती प्राप्त झाली असल्याचे सदर प्रकरणी दिसून येते. या प्रकरणी तक्रारदारास माहिती प्राप्त झाली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई | **(रामानंद तिवारी)**
दिनांक २६.३.२०१० | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६३९/०२,**

**श्री. पॉलीन फर्नांडीस,**
**१० राजन,ऑफ कार्टर रोड,**
**बांद्रा, मुंबई-४०००५०.** ..... **तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता(बी.अँड पी.)**
**एच/पूर्व वार्ड, सेंट मार्टीन रोड,**
**बांद्रा(प.), मुंबई-४०००५०** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. पॉलीन फर्नांडीस यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरीता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१.४.०९ रोजी अर्ज करुन श्री.अमीत खोजे,वार्ड अधिकारी, एच/पश्चिम, श्री.एम.एम.पटेल, वरिष्ठ अभियंता(इमारत व कंपनी)आणि श्री.एस.एस.जोशी वरिष्ठ अभियंता(इ.व क.)एच/पश्चीम विभाग, मुंबई यांचेविरुध्द केलेल्या कारवाईबाबतची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने, तक्रारदारास विहित कालावधीत मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.३२९९/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. अपीलकारास ३० दिवसात माहिती पुरवावी असे आयोगाने दि.२९.९.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने आयोगाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीवरील सुनावणीचेवेळी दि.३०.१२.०९ रोजीच्या माहितीच्या टिप्पणीची प्रत तक्रारदारास आयोगासमक्ष गैरतक्रारदाराने पुरविली.

यावरुन सदर प्रकरणी तक्रारदारास गैरतक्रारदाराने माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांक २६.३.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६५४/०२,**

**श्री. मधुकर कृष्णा धुरी,**
**तपोवन, के- शॉप नं.१अ,**
**सेनापती बापट मार्ग, लोअर परेल,**
**मुंबई-४०००१३.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपमुख्य अधिकारी,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. मधुकर धुरी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरीता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१८.३.०९ रोजी अर्ज करुन तक्रारदाराचे २.८० चौ.मि.चे दुकान होते. पुर्नविकासासाठी ते घेण्यात आले आणि २.२३ चौ.मि.च्या दुकानाचे वाटप करण्यात आले. शौचालय बांधकामाकरीता तक्रारदाराने रु.१०,०००/- इतकी अनामत रक्कम भरली होती. परंतु याबाबत गैरतक्रारदाराने काहीही पत्रव्यवहार केला नाही. तक्रारदाराने रु.५,२५०/- इतकी अधिक रक्कम भरली होती. याबाबत तक्रारदाराने अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने आयोगाकडे अपील क्र.३१६७/०२ दाखल कले होते. तक्रारदारास सदर प्रकरणी मागणीप्रमाणे ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.९.९.०९ रोजी आदेश पारित

केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन तक्रारदाराने अटी/शर्तीची पूर्तता केली नाही, अनधिकृत बांधकाम केले. कार्यालयाने दि.१८.१०.२००१ रोजी पत्र पाठवूनही तक्रारदाराने अटी/शर्तीची पूर्तता केली नाही. सबब दुकानाचे हस्तांतरण प्रकरण प्रलंबीत आहे असा गैरतक्रारदाराने आयोगास लेखी अहवाल सादर केला आहे. परंतु यामध्ये शौचालय बांधकामाबाबत काहीही खुलासा केलेला नाही. तक्रारदारास शौचालय बांधकामाबाबत माहिती हवी आहे. याबाबत गैरतक्रारदारानी माहिती पुरविलेली दिसत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६५३/०२,**

**श्री. भुषण भगवानदास घोडी पटेल,**
**भगवानदानदास हाऊस सी/१६,**
**चिंचोली बंदर रोड,मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा**
**स्लम ॲपीलिएट अधिकारी,**
**५वा मजला,गृहनिर्माण भवन, वांद्रे(प.),**
**मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. भूषण भगवानदास घोडी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.१२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१८.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन सी.टी.सर्व्हे क्र.१०६१, पार्ट १ ते २२ सर्व्हे क्र.४४८/२, सी.टी.सर्व्हे क्र.१०६० पार्ट १ ते १३ सर्व्हे क्र.४४८/३, सी.टी.सर्व्हे क्र.११३५ सर्व्हे क्र.४४० पार्ट १ येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाबाबत माहिती मागीतली हाती. गैरतक्रारदाराने पुरविलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.२००९/०२ दाखल केले होत. तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी असेआयोगाने दि.४.३.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणीप्रमाणे विहित कालावधीत माहिती दिली नाही. राज्य माहिती आयोगाच्या आदेशाचे पालन केले नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरीता गैरतक्रारदार यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती  लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६५२/०२,**

**श्री. भुषण भगवानदास घोडी पटेल,**
**भगवानदानदास हाऊस सी/१६,**
**चिंचोली बंदर रोड,मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४.** ..... **तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा**
**स्लम रिहॅबीलिटेशन अधिकारी,**
**५वा मजला,गृहनिर्माण भवन, वांद्रे(पू.),**
**मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. भूषण भगवानदास घोडी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१८.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२३.२.०७ रोजी अर्ज करुन तक्रारदाराने गैरतक्रारदाराकडे दि.२२.११.०६ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.१६३६/०२ दाखल केले होते. अपीलकारास ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.२९.६.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. राज्य माहिती आयोगाच्या आदेशाचे पालन केले नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरीता गैरतक्रारदारास जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे प्रतयक्ष भेटून लेखी खुलासा करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६२०/०२,**

**श्री. आत्माराम भिकोबा कामथे,**
**सचिव, एकता असोसिएशन,गौतम सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**प्लॉट क्र.५६, आर.टी.ओ. शेजारी,**
**चार बंगला,अंधेरी(प.),**
**मुंबई-४०००५३. ..... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप जिल्हाधिकारी(अति/निष्का) व सक्षम प्राधिकारी,अंधेरी,**
**गृहनिर्माण भवन, रुम नं.६५,तळमजला,**
**वांद्रे(पूर्व),मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. आत्माराम कामथे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.५.१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२२.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१६.११.०७ रोजी अर्ज करुन फेडरेशन ऑफ को.ऑप.हौसिंग सोसायटी एकता असोसिएशनच्या दि.१२.५.०७ च्या पत्रावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने समाधानकारक माहिती पुरविली नाही. अपूर्ण माहिती पुरविली. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.११४५/०२ दाखल केले होते. सर्व्हे क्र.१११/ड आंबीवली,अंधेरी येथील भूखंड क्र.४७ ते ५१ च्या भिंतीस लागून असलेली व कमलादेवी जैन हायस्कूल समोरील मैदानातील लक्ष्मी बिझनेस व झेरॉक्स सेंटर, निसर्ग कँटीनला जिल्हाधिकारी कार्यालयाकडून ३०X३० एवढया जागेचे अधिकृत वाटप करण्यात आले असेल तर त्या जागा वाटपाच्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत

तक्रारदाराची मागणी होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास सदर प्रकरणी १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.३.११.०८ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. मौजे आंबिवली,ता.अंधेरी येथील स.क्र.१११/डी मधील भूखंड क्र.४७ ते ५१ च्या भिंतीस लागून असलेली व कमलादेवी जैन हायस्कूल समोरील मैदानातील लक्ष्मी बिझनेस व झेरॉक्स सेंटर तसेच निसर्ग कँटीनला शासनाकडून/कार्यालयाकडून ३०X३० एवढया जागेचे वाटप करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर आदेशाची प्रत तक्रारदारास पुरविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असा जन माहिती अधिका-यांनी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. तसेच अपीलकारासही त्याप्रमाणे कळविले असल्याबाबत आयोगास दि.१७.३.२०१०च्या पत्राची प्रत सादर केली. यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली आहे. आयोगाच्या दि.३.११.०८ च्या आदेशाचे पालन केले आहे. दि.१७.३.२०१०च्या पत्राची प्रत आयोगासमक्ष गैरतक्रारदारानी तक्रारदारास दिली. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६५६/०२,**
**/६५७/**

**श्री. प्रशांत जयमल्हार बिडवई,**
**श्री.रामदर्शन अपार्टमेंट,२रा माळा,**
**शनिनगर, बदलापूर(प.),**
**ता.अंबरनाथ, जि.ठाणे,**
**पिन-४२१५०३.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**उत्तर नियंत्रण कक्ष, मुंबई ठाकूर व्हीलेज,**
**कांदीवली(पूर्व), मुंबई-४००१०१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. प्रशांत मल्हार बिडवई यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.१२.०९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.४.३.०९ व दि.३०.३.०९ रोजी अर्ज करुन मोटार अपघात एफआयआर क्र.२३/०८ दि.२५.१.०८ एमएचबी कांदीवली पोलीस स्टेशन गाडी क्र.एमएच-०२-एक्सए-०८३३ दि.३०.३.०९ एमएच-०२-६५५५ अपघातातील दोन्ही गाडयांचे पेपर, अपघातातील वाहन चालकाचे नाव, पत्ता कोर्ट केस क्र. पुढील तारीख तसेच कोणते कलम लावले ते लेखी द्यावे तसेच ड्रायव्हींग लायसन्सची कॉपी,दोषारोपपत्र, एफआयआर ॲक्सीडेंट रिपोर्ट,गुन्हयातील टिप्पणी साक्षांकित करुन द्यावी, गाडीचे पेपर, इन्शुरन्स, लायसन्सची प्रत, दोषारोपपत्र इत्यादी माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने पुरविलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्रमांक ३४५४/०२ व अपील

क्रमांक ३४५५/०२ दाखल केले होते. सदर प्रकरणी तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. कार्यालयातील जा.क्र.५१४९/दप्रवि/माहिती/०९ दि.२३.११.०९ अन्वये विहित वेळेत माहिती संकलीत केल्यावर दि.२५.११.०९ रोजी अपीलकार यांनी कार्यालयात स्वतः येऊन दुय्यम प्रतीवर दिनांकीत स्वाक्षरी करुन सदरची माहिती स्विकारलेली आहे असा गैरतक्रारदाराने आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी दि.२६.११.०९ च्या आदेशाचे गैरतक्रारदाराने पालन केले आहे. तक्रारदारास माहिती पुरविली आहे असे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०२०/७४७/०२**

**श्री. इरोल सिक्वेइरा,**
**३ए,पृथ्वी निवास,**
**प्रभात कॉलनी, सांताक्रुझ,**
**मुंबइर्-४०००५५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा**
**सहाय्यक आयुक्त(इमारती कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/पूर्व विभाग,**
**प्रभात कॉलनी, सांताक्रुझ(पूर्व),**
**मुंबई-४०००५५.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभिय्रता(इमारती व कारखाने,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/पूर्व विभाग,**
**प्रभात कॉलनी, सांताक्रुझ(पूर्व),**
**मुंबई-४०००५५.** **.... उत्तरवादी**

## विवेचन

अपीलकार श्री.इरोल सिक्वेइरा, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,(इमारत व कारखाने), बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/पूर्व विभाग,सांताक्रुझ, मुंबई यांच्याकडे दि.३.२.२००७ रोजी अर्ज करुन, पृथ्वी निवास सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील फ्लॅट क्रमांक ७ आणि ८ मध्ये श्री.प्रफूल शहा यांनी अनधिकृतपणे बेकायदेशिररित्या केलेले बांधकाम काढून टाकण्याबाबत केलेल्या कारवाईची अनुषंगिक माहिती मगितली होती.

जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते. द्वितीय अपीलावरील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी केलेल्या

कारवाईचा अहवाल आयोगासमोर सादर केला नाही. यामुळे जन माहिती अधिका-यांना दिनांक १७.११.०८ रोजी कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत आयोगाकडे खुलासा सादर केला नाही यास्तव त्यांच्याविरुध्द रु.१५,०००/- एवढया शास्तीचे आदेश आयोगाने दि.११.१२.०८ रोजी पारित केले. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी आयोगाकडे लेखी खुलासा सादर केला. सदर खुलाशाचे अवलोकन केले असता पृथ्वी निवास सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील फ्लॅट क्र.७ व ८ मध्ये श्री.प्रफुल शहा यांना बांधकाम करण्यास तत्कालीन वार्ड ऑफीसर यांनी दि.२८.१०.९४ च्या पत्रानुसार रु.१५००/- एवढे परवाना शुल्क आकारुन परवानगी दिली असल्याचे दिसून येते. सदर पत्राची प्रत प्रथम अपीलावरील सुनावणीच्यावेळी अपीलकारास देण्याची तयारी जन माहिती अधिका-यांनी दर्शविली होती. परंतु त्यावेळी अपीलकाराने ती स्विकारली नसल्याचा जन माहिती अधिका-यांनी खुलासा केला आहे. अपीलकाराने माहितीच्या अधिकारात अर्ज करुन माहिती पोस्टाने मागीतली आहे. अपीलकाराने दि.३.२.०७च्या अर्जान्वये एकूण ६ मुद्यांवर माहिती मागीतली होती. सदर माहिती अपीलकारास १५ दिवसाचे आत पुरवावी असे आयोगाने दि.१८.१२.०८ रोजी आदेश पारित केले होते. तसेच विलंबाबाबत जन माहिती अधिका-यांना रु.१५,०००/- शास्ती केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. आयोगाच्या दि.१८.१२.०८ च्या आदेशाचे पालन केले नाही. यामुळे अपीलकारास दि.१६.१०.०९ रोजी पुन्हा कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला. परंतु चार महिन्यांहून अधिक कालावधी उलटून गेला तरी जन माहिती अधिका-यांनी आयोगास खुलासा सादर केला नाही. अपीलकाराने माहिती मिळाली नसल्याने दि.१९.३.२०१० रोजी आयोगाकडे तक्रार करुन जन माहिती अधिका-यांना शास्ती करण्याबाबत आयोगास विनंती केली आहे. सबब मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इमारती व कारखाने)श्री.व्ही.जे. देसाई यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. आयोगाच्या दि.१८.१२.०८ च्या आदेशाचे पालन केलेले नाही. विलंबाबाबत श्री.देसाई यांना दि.१८.१२.०८ च्या आदेशान्वये रु.१५०००/- शास्ती लावली आहे. त्या व्यतिरिक्त या आदेशान्वये पुन्हा रु.१०,०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम श्री.देसाई यांच्या वेतनातून दोन समान मासीक हफ्त्यात वसूल करावी. सदर शास्तीची वसुली श्री.देसाई यांच्या मे-२०१० पासून सुरु करावी.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
दिनांक ८.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/५९६/०२,**

**श्री. आर.पी.यजुर्वेदी,**
**३०२/ए,नव-आसावरील को.ऑप.हौ.सो.,**
**१८२, जे.बी. नगर,जनकल्याण बँकेच्या समोर,**
**अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००५०. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**प्रिंटींग प्रेस कार्यालय-भायखळा,**
**सीमेंट बॅरॅक्स, भायखळा, मुंबई. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. आर.पी. यजुर्वेदी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१२.०९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.९.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.८.९.०९ रोजी अर्ज करुन प्रिंटींग प्रेसमधील एकूण कर्मचारी, पिंटींग क्षमता,वार्षिक बजेट, आऊट सोर्सींग इत्यादि अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने विहित कालावधीत माहिती पुरविली नाही यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील ३१८८/०२ दाखल केले होते. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती विहित कालावधीत गैरतक्रारदाराने पुरविली नाही. यामुळे गैरतक्रारदारास सदर प्रकरणी जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई सुरु का करण्यात येऊ नये याबाबत गैरतक्रारदाराने आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत खुलासा सादर करावा असे दि.१६.९.०९ रोजी आयोगाने आदेश पारित केले.

गैरतक्रारदार तथा व्यवस्थापक म्युनिसिपल प्रिंटींग प्रेस यांनी दि.२५.३.२०१० च्या पत्रान्वये सविस्तर खुलासा सादर केला आहे. सदर प्रकरणी अपलावरील तसेच तक्रारीवरील सुनावणीची आयोगाची नोटीस पोस्टातून विहित वेळेत मिळाली नसल्याने सुनावणीकरिता हजर राहता आले नाही असा गैरतक्रारदाराने दि.२५.३.२०१० च्या पत्रानुसार खुलासा केला आहे. तक्रारदारास मागणीप्रमाणे सविस्तर माहिती पोस्टाने दि.२०.६.०९ च्या पत्रान्वये पाठविली असल्याचा गैरतक्रारदाराने खुलासा करुन सदर पत्राची प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन असे दिसून येते की, तक्रारदाराने दि.८.४.०९ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन प्रिंटींग प्रेसबाबत माहिती मागीतली होती. त्यास अनुसरुन गैरतक्रारदाराने दि.२०.६.०९ च्या पत्रान्वये प्रिंटींग प्रेसमधील एकूण कर्मचारी, प्रिंटींग क्षमता, वार्षिक बजेट, आऊट सोर्सींग बाबत माहिती अगोदरच पुरविलेली दिसते. त्यानंतर तक्रारदाराने पुन्हा तीच माहिती दि.८.९.०९ च्या अर्जान्वये मागीतलेली दिसते. त्यास गैरतक्रारदाराने दि.१५.९.०९ रोजी उत्तर दिले असल्याचा खुलासा केला आहे. यावरुन असे दिसून येते की, गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणी प्रमाणे माहिती पुरविलेली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/५०९/०२,**
**/५११/**

**श्री. प्रमोद विठ्ठल साळगांवकर,**
**सरदार बळवंतसिंग धोडी मार्ग,**
**माझगांव, मुंबई-४०००१०.** ..... **तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी**
**एस.आर.ए., ५वा मजला,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. प्रमोद साळगांवकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.१०.०९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२२.१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन सेठना कंपाऊंड धोदी मार्ग आणि शिवदास चापसी मार्ग,ई विभाग येथील मालमत्तेच्या पुर्नविकास योजनेतील आयुक्त, महानगरपालिका, मुंबई यांचेकडे दि.३.३.०९ रोजी दुपारी ३.३० वाजता झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या प्रतीची मागणी केली होती. महानगरपालिका आयुक्त कार्यालयाकडून इतिवृत्ताची प्रत प्राप्त झाली नसल्याबाबत गैरतक्रारदाराने तक्रारदारास कळविले. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. तक्रारदारास ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.३१.८.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन आयोगाकडे तक्रार केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदारास दि.६.२.१० रोजी कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला आहे. गैरतक्रारदाराने दि.२९.३.२०१० च्या पत्रान्वये आयोगास सविस्तर

खुलासा सादर केला आहे. सदर खुलाशाचे अवलोकन केले असता आयोगाच्या दि.३१.८.०९ च्या आदेशास अनुसरुन गैरतक्रारदाराने तक्रारदारास कार्यालयात बोलावून सर्व संबंधीत कागदपत्रांची तपासणी केली. सदर कागदपत्रामध्ये दि.३.३.०९ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या प्रती आढळून आल्या नाहीत. दि.३.३.०९ रोजी महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्त हे आयुक्तांच्या कार्यालयामार्फत तयार करण्यात आलेले नाही. यास्तव तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन देणे शक्य झाले नाही असा गैरतक्रारदाराने दि.२९.३.२०१०च्या पत्रान्वये आयोगाकडे लेखी खुलासा सादर केला आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २६.३.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**